बी.एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकः बाळासाहेब मस्के


बीड | रविवार, दि.२८ जुलै २०२४ | वर्षे ३रे | अंक ३६४वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

## पूजा खेडकरांना अपंगत्वाचे प्रमाणपत्र?

पिंपरी : भारतीय प्रशासकीय सेवेतील प्रशिक्षणार्थी अधिकारी पूजा खेडकर यांनी पिंपरी-चिंचवडमधील यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामधील (वायसीएम) शिकाऊ डॉक्टरकडून तपासणी करून अपंगत्वाचे प्रमाणपत्र दिल्याचे उघडकीस आले आहे. केंद्र शासनाच्या नियमावलीचे पालन करून सात टक्के अपंगत्वाचे प्रमाणपत्र दिल्याबाबतचा 'वायसीएम'च्या अधिष्ठात्यांचा अहवाल महापालिका आयुक्तांनी फेटाळला असून, पुन्हा चौकशी करून सुधारित अहवाल देण्याचा आदेश दिला आहे.

निती आयोगाच्या बैठकीत नरेंद्र मोदींचा विश्वास

# २०४७ पर्यंत विकसित भारत!



### गव्हर्निंग कौन्सिल बैठक अध्यक्षपद मोदींनी भूषविले • परदेशी गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी धोरणे • सरकारी योजना सक्षमपणे लागू करण्याचे केले आवाहन

> हे दशक तंत्रज्ञान आणि भू-राजकीय बदलांचे आहे, तसेच ते संधींचेही आहे. भारताने या संधी साधाव्यात आणि आंतरराष्ट्रीय गुंतवणुकीसाठी वातावरण पोषक करावे. भारताला विकसित राष्ट्र करण्याच्या दृष्टीने प्रगतीसाठी हा निर्णायक टप्पा आहे.
>
> – नरेंद्र मोदी, पंतप्रधान

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

भारताला २०४७पर्यंत विकसित राष्ट्र करणे ही प्रत्येक भारतीयाची महत्त्वाकांक्षा आहे,'' असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी केले. हे ध्येय साध्य करण्यासाठी राज्ये सक्रिय भूमिका निभावू शकतात, कारण त्यांचा थेट जनतेशी संपर्क असतो, असे ते म्हणाले. निती आयोगाच्या नवव्या गव्हर्निंग कौन्सिलच्या बैठकीचे अध्यक्षपद मोदींनी भूषविले. या कौन्सिलमध्ये सर्व राज्यांचे मुख्यमंत्री, केंद्रशासित प्रदेशांचे नायब राज्यपाल आणि अनेक केंद्रीय मंत्र्यांचा समावेश आहे.राष्ट्रपती भवनाच्या सांस्कृतिक केंद्रामध्ये आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीत उपस्थितांना संबोधित करताना मोदी यांनी आपला देश तरुणांचा असल्याचे सांगितले. तसेच परदेशी गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी राज्यांनी धोरणे आखावीत, असे आवाहनही त्यांनी या वेळी केले.

निती आयोगाने दिलेल्या माहितीनुसार, २६ मुख्यमंत्री व नायब राज्यपालांनी बैठकीला हजेरी लावली. बैठकीला मुख्यमंत्री गैरहजर राहिल्यास संबंधित राज्यांचे नुकसान होते, असे आयोगाने स्पष्ट केले. या बैठकीत भारताला २०४७पर्यंत विकसित राष्ट्र करण्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले. त्यासाठी केंद्र व राज्यांचा प्रशासनातील सहभाग आणि सहकार्य, सरकारी योजना सक्षमपणे लागू करून ग्रामीण व शहरी भागांमध्ये जीवनाची गुणवत्ता वाढवणे याचे ध्येय ठेवण्यात आले आहे. तसेच, गेल्या वर्षाच्या अखेरीस डिसेंबरमध्ये झालेल्या मुख्य सचिवांच्या तिसऱ्या राष्ट्रीय परिषदेमध्ये करण्यात आलेल्या शिफारशींवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे, अशी माहितीही आयोगाने दिली.

## आरोग्य सेवा सक्षम करण्यासाठी प्रयत्न

### डॉ.योगेश क्षीरसागर : बीडमध्ये पार पडले आरोग्य शिबिर




बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री ना.अजित पवार यांचा वाढदिस सामाजिक उपक्रमांनी साजरा करत आहोत. पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त चष्मा असलेल्या रुग्णांवर 'लॅसिक' शस्त्रक्रियेचे आयोजन केले होते. आपण वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत असल्याने बीड मतदारसंघातील जनतेच्या आरोग्याची काळजी घेणे आमचे कर्तव्य आहे, त्याअनुषंगाने बीड मतदारसंघातील आरोग्य सेवा सक्षम करण्यासाठी प्रयत्न करू, अशी ग्वाही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले.

राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त व कृषिमंत्री तथा पालकमंत्री ना.धनंजय मुंडे मार्गदर्शनाखाली आयोजित मोफत आरोग्य शिबिराचे शहरातील सौ. के.एस.के. महाविद्यालयाच्या सभागृहात शनिवारी (दि.२७) सकाळी ११.३० वाजता उद्घाटन झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून डॉ.योगेश क्षीरसागर हे बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून डॉ.सारिकाताई क्षीरसागर, राष्ट्रवादी डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ.रमेश शिंदे, आरोग्य शिबिराचे समन्वयक संजय सेवलकर, निजाम पठाण, अधिव्याख्याता डॉ.सय्यद अमजद, लिंबागणेशचे सरपंच बालासाहेब जाधव, नगरसेवक शुभम धूत, अल्पसंख्याक सेलचे तालुकाध्यक्ष समीर शेख, ईश्वर धनवे, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष शुभम कातांगळे, पान २ वर...

## विधानसभा निवडणुका जवळ, तयारीला लागा

### जयंत पाटील : बीडमध्ये निष्ठावंत कार्यकर्त्यांचा मेळावा



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

विधानसभेच्या निवडणुका जवळ आल्या आहेत. आता सर्वांनी जोमाने कामाला लागा. ज्याप्रकारे लोकसभा निवडणुकीत संविधान वाचवण्यासाठी मतदानरूपी योगदान दिले त्याचप्रमाणे आता भ्रष्टाचारमुक्त महाराष्ट्र घडविण्यासाठी योगदान द्या असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आ.जयंत पाटील यांनी बीड येथे झालेल्या निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात केले.

शनिवारी (दि.२७) रोजी राष्ट्रवादी भवन बीड येथे बीड जिल्ह्यातील निष्ठावंत कार्यकर्त्यांचा मेळावा पार पडला. या मेळाव्यासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आ.जयंत पाटील उपस्थित होते. यावेळी आ.जयंत पाटील यांनी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्ह्यातील मतदारसंघनुसार आढावा घेतला. इच्छुक उमेदवार कार्यकर्ते आपल्या शिष्टमंडळ आणि समर्थकांना घेऊन मुंबईला बोलावणे योग्य वाटत नसल्यामुळे मी स्वतःच, आढावा घेण्यासाठी प्रत्येक पान २ वर...

## केजमध्ये चोरांचा सुळसुळाट!

### बोंबला : ट्रकमधील तूर अन् सोयाबीनची चोरी



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

उदगीरकडून केज मार्गे जालन्याकडे जात असलेल्या ट्रकमधील तूर आणि सोयाबीनचे कट्टे केज पोलीस ठाण्याच्या हद्दीत अज्ञात चोरट्यांनी चोरले आहेत. त्याची एकूण किंमत ७८ हजार रु. आहे. मध्यप्रदेश राज्यातील मनसुवर जिल्ह्यात जगदिश हजरीलाल नारावत (रा. पांगा, ता. भानपुरा) हा राजस्थान राज्यातील जालावाड जिल्ह्यातील राजू बंजारा यांच्या मालीच्या टेम्पो क्र. (आर जे१७/जी ए ८५४०) वर ड्रायव्हर म्हणून काम करीत आहे. दि.१९ जुलै रोजी जगदीश नारावत राजस्थान राज्यातील कोटा येथील ट्रान्सपोर्ट कंपनीमधून तणनाशक व सोयाबीन फवारणीचे औषध घेऊन उदगीर येथे प्रकाश राजाराम मुंदडा (रा. उदगीर, जि. लातुर) यांचे जगदीश कृषी सेवा केंद्र या दुकानात माल पोहोचवला. त्या नंतर त्या दुकानदाराने जगदीश नारावत याला सोयाबीनचे १२९ कट्टे व तुरीचे पान २ वर...

## राज्यातील प्रकल्पांना गती द्या!

### धोरण : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मागणी



दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

ठाणेअंतर्गत मेट्रो प्रकल्पाला केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी द्यावी, दहिसर-अंधेरीतील पुनर्विकास प्रकल्पांसाठी 'फनेल रडार झोन' स्थलांतरित करावा, पुणे-नाशिक सेमिहाय स्पीड रेल्वे प्रकल्प तसेच, कराड-चिपळूण रेल्वे प्रकल्प आदींना गती द्यावी, अशा विविध मागण्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शनिवार निती आयोगाच्या गव्हर्निंग कौन्सिलच्या बैठकीत केल्या. राज्यातील कांदा-सोयाबीन शेतकरी, दूध उत्पादकांच्या समस्याही शिंदे यांनी बैठकीत मांडल्या. सर्व प्रश्नांच्या निराकरणासंदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे शिंदे यांनी बैठकीनंतर सांगितले. मुंबईतील 'बीपीटी'च्या ६ एकर जागेचा योग्य वापर करून मरिन ड्राईव्हसारखी चौपाटी विकसित करण्याचा प्रस्तावही मुख्यमंत्र्यांनी मांडला. कांद्याच्या किंमत स्थिरीकरण निधी पान २ वर...

## उपोषण करताच प्रशासन ताळ्यावर!

### दिलासा : पत्रकार रोहन गलांडेंच्या आंदोलनाला यश!




केज/पुण्यभूमी प्रतीनिधी

केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील श्री संत नामदेव महाराज तीर्थक्षेत्र विकास कामाला काम सुरू करण्यासाठीची तीर्थक्षेत्राचे काम प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली जात नाही तोपर्यंत आमरण उपोषणाला बसले होते तरी उपोषणाच्या तीसऱ्या दीवशी सार्वजनिक बांधकाम केज यांनी प्रत्यक्षात कामाला सुरुवात केली व मागण्या तीर्थक्षेत्राचे काम सुरू केल्यानंतर पुर्ण करण्यासाठी पाच मागणी मान्य,काम सुरू केल्यानंतर बंद करण्यात येणार नाही मागणी मान्य,तीर्थक्षेत्रांच्या कामासाठी लागणारी पुर्ण सामग्री कार्यक्षेत्रात उपलब्ध कधी तर उपलब्ध केली आहे मागणी मान्य ,तीर्थक्षेत्र तात्काळ कामाला स्वता गुत्तेदार , बांधकाम विभागाचे अधिकारी, गावकरी यांच्या हस्ते नारळ फोडुन करण्यात यावे मागणी मान्य.काम बंद केले तर याला जबाबदार कार्यकारी अभियंता युवराज मळीकर आहे.वरील प्रमाणे विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे व मागण्या मान्य करुन व इतर पान २ वर...

# ओबीसींचे १०० आमदार निवडून आणूया

### ॲड. प्रकाश आंबेडकर : आरक्षणाच्या मुद्द्यावर राजकीय पक्षांनी भूमिका स्पष्ट करावी




कोल्हापूर/पुण्यभूमी प्रतिनिधी

वंचित बहुजन आघाडी आयोजित आरक्षण बचाव यात्रा कोल्हापूर येथे शुक्रवारी दाखल झाली. या वेळी पत्रकार परिषदेत वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे की, ओबीसींचे १०० आमदार निवडून आले पाहिजेत असे आमचे मत आहे. राज्यातील २२ जिल्ह्यांत आमची आरक्षण बचाव यात्रा सुरू आहे. महाराष्ट्रात सध्या जे दूषित वातावरण तयार झाले आहे ते शांत आणि नितळ करण्यासाठी आम्ही ही यात्रा काढली आहे.

आरक्षणाच्या प्रश्नावरून टोलवाटोलवी सुरू आहे. मराठा आरक्षणाच्या संदर्भात काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना, भाजप यांनी आपापल्या भूमिका स्पष्ट करण्याची मागणीही या वेळी ड. आंबेडकर यांनी केली.

ड. आंबेडकर म्हणाले की, सगेसोयरे आरक्षणाला आमचा विरोध आहे. सुप्रीम कोर्टाने सगे सोयाऱ्यांच्या बाबतीत जे जजमेंट दिले आहे. त्यामध्ये सगेसोयरे आरक्षण नाकारले आहे. त्यामुळे कोर्टात हे आरक्षण टिकणार नाही. यावेळी त्यांनी काँग्रेस आणि राष्ट्रवादी यांच्यावरसुद्धा तोफ डागली. ते म्हणाले की, काँग्रेस आणि राष्ट्रवादी फक्त मराठ्यांचे पक्ष राहिले आहेत. भाजप आणि शिवसेना सुद्धा मराठा आरक्षणावर भूमिका स्पष्ट करत नाही. भाजप झुंज लावून बघत बसलेला पक्ष असल्याची टीका त्यांनी भाजपवर केली.

प्रत्येक राजकीय पुढारी आता मला माझ्या समाजाची मते कशी मिळतील हे बघत आहे. पण राज्यात शांतता प्रस्थापित करण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. यात्रेनंतर विधानसभेचे पाहू, असेही आंबेडकर यांनी म्हटले. आम्हाला दोन्हीकडून बाजूला सारले जाते, हे म्हणतात हे आमचे नाहीत, ते म्हणतात हे आमचे नाहीत. मला भाजपची बी टीम सुद्धा म्हटले जाते. मात्र, मला कोणी हरवले ? मला भाजपने हरवले मग मला भाजपची बी टीम कशी म्हणता ? असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

## माझी लाडकी बहीण योजनेला प्रतिसाद

### अजित पवार : १ कोटी महिलांकडून ऑनलाईन अर्ज



मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्राचा उपमुख्यमंत्री आणि राज्याचा अर्थ व नियोजन मंत्री म्हणून यंदाच्या २०२४-२५ च्या अतिरिक्त अर्थसंकल्पात मी जाहीर केलेल्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेला राज्यातल्या माता-भगिनी-कन्यांचा उदंड प्रतिसाद मिळत असून महिना पूर्ण होण्याच्या आतंच १ कोटींहून अधिक भगिनींनी ऑनलाईन अर्ज दाखल केले आहेत. योजनेचं यश बघून विरोधकांना पोटशुळ उठला असून प्रसारमाध्यमांमध्ये तद्दन खोट्या, निराधार बातम्या पसरवून 'फेक नॅरेटीव्ह' निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. 'फेक नॅरेटीव्ह' निर्माण करण्याच्या विरोधकांच्या प्रयत्नांना राज्यातील जनता, माता-भगिनी बळी पडणार नाहीत. त्या आमच्यासोबतंच आहेत आणि राहतील, असा विश्वास राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजनमंत्री अजित पवार यांनी आज व्यक्त केला.

राज्यातील काही वर्तमानपत्रे आणि वृत्तवाहिन्यांवर 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेला वित्त विभागाचा विरोध' आणि 'योजनेसाठी निधी कुठून आणणार ?' अशा आशयाच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या आहेत. या बातम्या तद्दन खोट्या, कपोलकल्पित, वस्तुस्थितीशी विसंगत, 'फेक नॅरेटीव्ह' निर्माण करण्यासाठी राजकीय हेतूने पसरवण्यात आल्याचा आरोप उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केला आहे. यासंदर्भात अधिक स्पष्टीकरण पान २ वर...

## मगरमिठीत महानगरे

एक दिवस पडलेल्या मुसळधार पावसाने, खडकवासला धरणातून सोडल्या गेलेल्या जादा पाण्याने पुण्यातल्या नागरिकांची उडालेली दैना हे आपल्या तथाकथित विकासाचे, स्मार्ट शहरांच्या स्वप्नाचे अत्यंत भकास आणि विद्रूप रूप आहे. गावांच्या तुलनेत शहरे विकसित, रोजगार देणारी, चांगले जीवनमान देणारी मानली जातात. ती कुठला ना कुठला रोजगार देतात हे खरेच. पण एरवीच्या बकाली, प्रदूषण या प्रश्नांच्या जोडीला आता पावसाचे पाणी थेट घराच्या दारातच आणून सोडू लागली आहेत. पुण्यात आनंदनगरमधल्या निंबजनगरसारख्या भर शहरात असलेल्या वस्तीमध्ये राहणाऱ्या लोकांना होडीतून बाहेर आणावे लागणे हे दृश्य त्यामुळे विदारकच होते. काल ते पुण्यात होते, त्याआधी कधी मुंबईत, कधी ठाण्यात, कधी कोल्हापुरात, कधी चिपळूणमध्ये एवढेच नाही तर चेन्नई, बेंगळूरु, कोलकाता, श्रीनगर अशा कोणत्याही शहरात या ना त्या पावसाळ्यात कोणत्या ना कोणत्या भागात अशीच परिस्थिती असते. एखादा मोठा पाऊस होऊन गेल्यानंतर रस्त्यांवरून नदीसारखे वाटावे अशा पद्धतीने वाहणारे पाणी, कुठे कुठे जीव मुठीत घेऊन थांबलेली माणसे आणि पाण्यातून वाहून जाणाऱ्या दुचाक्याच नाही तर चारचाक्याही. या दुरवस्थेतून आता कुठलीही शहरे सुटलेली नाहीत. पाणीटंचाई झेलत उन्हाळ्याचे चार महिने काढल्यानंतर आलेला पाऊस असा जीवघेणा ठरतो हे विकासाच्या कोणत्या स्वप्नात बसते हा प्रश्न तिथल्या रहिवाशांना पडत असेलच, पण तो विचारणार कुणाला? पावसाने झोडपले तर तक्रार कोणाकडे करायची, हे अद्यापही कुणाला माहीत नाही. कारण पावसाने एखाद्या शहराला झोडपले तरी त्यातून निर्माण होणाऱ्या परिस्थितीचा नागरिकांना फटका बसू नये ही तळपासून वरपर्यंत कोणत्याच राजकारण्यांना, प्रशासकांना त्यांची जबाबदारी कुठे वाटते? राजकारण्यांच्या दृष्टीने नागरिक म्हणजे फक्त निवडणुकीच्या काळात मते देणारे मतदाते. प्रशासकांच्या दृष्टीने नागरिक म्हणजे दरमहा त्यांचे पगार, भत्ते यांची सोय करणारे करदाते. यापलीकडे नागरिकांच्या जगण्यामरण्याशी त्यांना काहीच देणेघेणे नाही. आज ते पुरात मरतील, उद्या पाण्याअभावी, परवा एखाद्या आगीत काय फरक पडतो? राज्यकर्त्यांना रामराज्य आणायचे असेल तर नागरिकांना रामभरोसे जगावेच लागते, याचे यापेक्षा आणखी उदाहरण काय पाहिजे?

नगरनियोजनाची ऐशीतैशी म्हणजे आपली सगळी शहरे आणि निमशहरे. शहरे म्हणजे खरे तर मोठी खेडीच. घरे, रस्ते, वीज, पाणी यांच्या बाबतीत त्यांची लोकसंख्या सामावून घेण्याची क्षमता किती आहे, याचा विचारही न होता, ती फुगत चालली आहेत. त्यामुळे मागणी तसा पुरवठा या न्यायाने घरे उपलब्ध करून देणे आले. एखाद्या शहराच्या बाहेरील परिसर महापालिकेत समाविष्ट होण्याची कुणकुण लागली की तिथे गवत उगवावे तशा इमारती उभ्या राहतात. बांधकामांच्या सगळ्या नियमांचे उल्लंघन हीच जणू त्यांची पूर्वअट असते. साहजिकच तिथली घरे तुलनेत स्वस्तात उपलब्ध असतात. त्यामुळे मग ती विकत घेतली जातात. कालपरवा पाण्याखाली गेलेले पुण्यातील निंबजनगर हे गेल्या ३०-४० वर्षांमध्ये अशाच पद्धतीने मुठा नदीच्या अगदी पात्रालगत उभे राहिले आहे. अगदी खेटून असलेल्या इमारती, निकृष्ट बांधकाम हे सगळे करून त्यात पैसे कमावणारे सगळेच जण बाजूला झाले आहेत आणि तिथल्या रोजच्या प्रश्नांशी झगडतो आहे तो तिथे राहणारा सामान्य माणूस. नगररचनेशी, नगरनियोजनाशी देणेघेणे नसलेल्या राज्यकर्ते आणि प्रशासकांच्या अभद्र युतीमुळे तो जगण्यातल्या समस्यांमध्ये किती खोलवर बुडाला आहे, हे त्याला प्रत्यक्षात बुडवायला येणाऱ्या पाण्याला कसे समजणार?

# अविरत संघर्ष ;अद्वितीय लोकनेत्या



महाराष्ट्राच्या राजकारणात अनेक महिलांनी ठसा उमटविला आहे.भलेही महिलांना हवं तेवढं नेतृत्व करण्याची संधी मिळाली नसेल पण त्यातही जी संधी मिळाली किंवा चालून आली त्या संधीच सोनं केलं नाही तर नवल. अश्या महिला राजकारणी कायम राजकारणातील केंद्रबिंदू राहिल्या आहेत.यात अनेक महिलांनी देशाचं प्रतिनिधित्व केलं तर अनेकांनी राज्यात आपली वेगळी ओळख निर्माण करून स्वतः भोवती राजकारण फिरवलं. त्यापैकी एक महिला नेत्या म्हणजे पंकजा मुंडे.जरी राजकारणात यशस्वी होण्यासाठी राजकीय वारसा मिळाला असेल तरी शेवटी राजकारणात स्वतःला सिद्ध करावच लागतं.पंकजा मुंडे यांना राजकारणात राजकीय वारसा घरातून मिळाला असला तरी त्यांनी वडिलांच्या निधनानंतर स्वतः संघर्ष करीत राजकारणात आपलं स्थान सिध्द केलं मग संघर्ष यात्रेच्या माध्यमातून असेल किंवा परिक्रमा यात्रा असेल. महाराष्ट्रातील राजकारण पंकजा मुंडे या नावाभोवती फिरत .हे कोणालाही मान्य करावं लागेल. कारण, त्यासाठी त्यांनी अथक संघर्ष केला आहे. त्यामुळे त्यांच्या नावाची चर्चा होत असते. देशातील किंवा राज्यातील राजकीय घडामोडी घडत असताना पंकजा मुंडे यांचे नाव चर्चेत नाही असे शक्य नाही. त्यांच्या नावाची चर्चा कोणत्याही पक्षांत या ना त्या कारणाने सुरू असते. महाराष्ट्रातील ओबीसींचा महिला चेहरा म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात असले तरी त्यांनी कधी ओबीसीच भांडवल केलं नाही. एक सर्वसमावेशक राजकारण केलं.अमुक तमूक जातीच्या राजकारणाला पंकजा मुंडे नांव कधीच चिकटलं नाही. त्यामुळे महाराष्ट्रातील आणि देशभरातील तमाम बहुजन समाज त्यांच्याकडे बहुजन नेतृत्व म्हणून पाहतो. आज परिवर्तनाची सुरुवात करण्यासाठी समतेचा विचार रुजविण्यासाठी बहुजन नेतृत्व पुढे येत आहे. त्यात गोपीनाथ मुंडे यांच्यापासून समतेचा आणि बहुजन विचार पुढे घेऊन जाण्यासाठी पंकजा मुंडे सतत संघर्षरत असतात. महाराष्ट्र हा महापुरुषांचा आणि त्यांचा विचार कधी जातीपातीचा नव्हता तर तमाम बहुजनांच्या कल्याणासाठी होता. हे वेगळं सांगण्याची गरज नाही तेच महापुरुषांचे विचार तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी नेतृत्वाची तितकीच गरज आहे.जातीपातीच राजकारण पुन्हा डोके वर करू पाहत असताना, बहुजन नेतृत्वाची गरज असण साहजिक आहे.

गोपीनाथ मुंडें यांच्या निधनानंतर बीड जिल्ह्यातील जनतेसाठी काही क्षणानंतर पंकजा मुंडे यांनी डोळे पुसले आणि बीड जिल्ह्यातील जनतेची अस्मिता असलेल्या गोपीनाथ मुंडे यांच्यावर प्रेम करणार्या जनतेसाठी त्या पुढे सरसावल्या पोरक्या



पदमाकर उखळीकर,
मो.९९७५१८८९१२

झालेल्या समाजाची माऊली झाल्या. वडीलांच्या निधनाच दुःख गिळून त्यांनी समाजाला सावरलं. असे नेतृत्व सहजासहजी तयार होत नाही. त्यासाठी शिव -शाहू- फुले -आंबेडकरांच्या विचारांची शिदोरी सोबतीला लागते.त्यासाठी महापुरुष समजून घ्यावे लागतात. पंकजा मुंडे यांना राजकीय वारसा वडिलांकडून मिळाला असे सहज म्हणता येते.पण,तो वारसा टिकविण्यासाठी अविरत संघर्ष करावा लागतो हे विसरून चालणार नाही.२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत पंकजा मुंडे यांचा पराभव झाला आणि तो पराभव जिव्हारी लागल्याने बीड जिल्ह्यातील पाच जणांनी आत्महत्या केल्या.मला वाटत ही देशातील एकमेव घटना असेल की, एखाद्या नेत्याच्या पराभवामुळे कोणी आत्महत्या करेल.एवढं प्रेम कोणी कोण्या नेत्यांवर करतं असेल असे क्वचितच .वडिल गोपीनाथ मुंडे यांनी सामान्य कार्यकर्त्यांपासून भारतीय जनता पक्षात केलेला संघर्ष आणि बीड जिल्ह्यातील तमाम बहुजनांच्या हक्कासाठी केलेले आंदोलने त्यातून तावून सुलाखून निघालेल्या नेत्याची केंद्रीय मंत्री पदापर्यंतची वाटचाल सामान्य नव्हती ती तितकीच खडतर होती तर त्यांच्या अकाली निधनानंतर पंकजा मुंडे यांच्यावर कौटुंबिक आणि गोपीनाथ मुंडे यांच्यावर प्रेम करणार्या जनतेची जबाबदारी हा सुद्धा सामान्य संघर्ष नाही.भारतीय जनता पक्षासाठी अहोरात्र मेहनत घेऊन , महाराष्ट्रात भाजपची सत्ता २०१४ साली आली आणि पंकजा मुंडे यांनी परळी विधानसभा निवडणुकीत विजय मिळवून महाराष्ट्रात सत्ता आणण्यासाठी अथक परिश्रम घेतले.त्यांना मंत्री मंडळात ग्रामीण विकास व जलसंधारण मंत्री म्हणून जबाबदारी मिळाली आणि त्यांनी संधीच सोनं केलं.२०१४ साली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली मंत्रीमंडळातील कामकाज पाहून जनतेने पुन्हा यूती ला निवडून आणले तर भारतीय जनता पक्षाचे १०५ आमदार निवडून दिले हे कार्याचे फलित. तत्कालीन राजकीय घडामोडी काय घडल्या हे सांगावयास नको.ते माहिती असेल. पण तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मंत्रिमंडळ यांच्या व जलसंधारण कामांना जनतेने कौल दिल्याचे कुणालाही मान्य करावच लागेल.असो, पंकजा मुंडे या संधीच सोनं करू शकतात हे महाराष्ट्रातील जनतेला आणि सर्व पक्षांतील नेत्यांना वेगळं सांगण्याची गरज नाही. जनतेच्या आशा आकांक्षाच दुसरं नांव म्हणजे पंकजा मुंडे आहे. आज त्यांचा वाढदिवस त्यानिमित्ताने केलेला लेखप्रपंच.



## पाटोदा लोक न्यायालयात सहाशे चार प्रकरण निकाली

पाटोदा /पुण्यभूमी प्रतिनिधी

जिल्हा न्यायालयाचे सुचनेनुसार दिनांक २७/०७/२०२४ रोजी पाटोदा येथील न्यायालयात लोक न्यायालयाचे आयोजन करण्यात आले होते. त्यात एकुण ६०४ प्रकरणे निकाली काढण्या आली. त्यात एकुण ३६८१६५८ रुपयाची वसुली झाली. याबाबत अधिक माहिती अशी की, न्यायालयात प्रलंबित दिवाणी दावे दाखल पुर्व प्रकरणे, बँकेची कर्ज प्रकरणे, चेकबाबतची प्रकरणे, ग्रामपंचायत थकबाकी प्रकरणे, घरगुती कौटुंबीक वाद, पोटगीची प्रकरणे आणि तडजोडपात्र प्रकरणे हे सामोपचाराने आपसात तडजोड करण्यासाठी दिनांक २७.०७.२०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता लोकन्यायालयाचे आयोजन करण्यात आले होते. सदर न्यायालयात दिवाणी ८५ प्रकरणे, फौजदारी ९ प्रकरणे, बँकेचे ३३ प्रकरणे, तसेच ग्रामपंचायत थकबाकी ४७७ प्रकरणे ईत्यादी प्रकरणे निकाली काढण्यात आली. फौजदारी प्रकरणात रक्कम रुपये ११६२८०० आणि बँक व ग्रामपंचायतचे प्रकरणात थकबाकी रुपये २५,१८,८५८ अशी एकुण ३६८१६५८ रुपयाची वसुली करण्यात आली. या न्यायालयासाठी एकुण २ पॅनल तयार करण्यात आले होते. पॅनल क्रमांक १ वर श्रीमती एस. एन. निकम मॅडम, दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पाटोदा या होत्या पॅनल मेंबर विधीज्ञ बी. आर. लवुळ हे होते तसेच पॅनल क्रमांक २ वर श्रीमती ए. ए. पाटील मॅडम, सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पाटोदा या होत्या व पॅनल मेंबर विधीज्ञ बी.डी.तवार हे होते. हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी तालुका वकील संघ, पाटोदा यांच्या विधीज्ञांनी मोलाचे सहकार्य केले. या लोकन्यायालयात विधिज्ञांचा व पक्षकारांचा उत्स्फुर्त प्रतिसाद दिसुन आला.

## पान एक वरून

### आरोग्य सेवा सक्षम करण्यासाठी

अल्पसंख्याक शहराध्यक्ष माजेद कुरेशी, महिला आघाडीच्या शालिनीताई परदेशी, सरपंच साईनाथ कैतके, शेख खदिर, गजानन देवकर, धनंजय वाघमारे, गुड्डू चाऊस, विठ्ठल गुजर, माऊली मारकड, यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.पुढे बोलताना डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, ग्रामीण भागात आजही आरोग्य सुविधांची कमतरता आहे. मी आणि डॉ.सारिका या आरोग्य क्षेत्रात कार्यरत असल्याने आम्हाला त्याची जाण आहे. आपल्या भागातील गरजू रुग्णांना आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शिबिराचे आयोजन केले आहे. प्रास्ताविक डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी केले. सूत्रसंचलन प्रा.पांडुरंग सुतार यांनी केले. आभार डॉ.रमेश शिंदे यांनी मानले. दिवसभर रुग्णांनी गर्दी केली होती.

**तज्ञ डॉक्टरांची उपस्थिती ;मोफत शस्त्रक्रिया होणार** : आरोग्य शिबिरात १ हजार ५६ रुग्णांवर उपचार करण्यात आले, त्यापैकी दोनशेहून अधिक रुग्णांवर शस्त्रक्रिया केली जाणार आहे. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार हृदयाची अँजिओग्राफी, कॅन्सर शस्त्रक्रिया, अँजिओप्लास्टी, तिरळेपणाच्या शस्त्रक्रिया, मूत्रमार्ग शस्त्रक्रिया, गर्भ पिशवी दुरुस्ती, डायलिसिस, हर्निया शस्त्रक्रिया, डोळ्याच्या सफेद पडद्याची शस्त्रक्रिया, हाडांचे फॅक्चर, बायपास, कानाच्या पडद्याची शस्त्रक्रिया, हृदयाला असलेले छिद्र, मणक्याच्या शस्त्रक्रिया, मोतीबिंदू, छाती आणि पोटाची शस्त्रक्रिया, व्हॉल्व रीप्लेसमेंट आदी शस्त्रक्रिया सर्व सोयीसुविधायुक्त नामांकित रुग्णालयांमध्ये मोफत केल्या जाणार आहेत.

### विधानसभा निवडणुका जवळ

जिल्ह्यात जात आहे. आपल्याला शेतकरी, कामगार, कष्टकरी, कामगार, महिला, विद्यार्थी, युवक या सर्वांना सोबत घेऊन आपल्या महाराष्ट्रात लोकशाही व संवैधानिक मार्गाने काम करणारे सरकार स्थापन करण्यासाठी येणार्या विधानसभा निवडणुकीत बहुमत मिळवावे लागेल आणि त्यासाठी सर्वांनी आतापासून कामाला लागा. असे आवाहन राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आ.जयंत पाटील यांनी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांना केले. यावेळी बीड लोकसभा मतदारसंघाचे खासदार बजरंग सोनवणे, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष तथा बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार संदीप क्षीरसागर, जिल्ह्यातील पक्षाचे सर्व माजी आमदार, प्रमुख पदाधिकारी आणि जिल्ह्यातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### केजमध्ये चोरांचा

२३ कट्टे पंधरा किलो तूर घेऊन जालना येथे घेऊन जाण्यास सांगितले. तो ट्रकमधून हा माल केज मार्गे जालन्याकडे घेऊन जात असताना दि. २४ जुलै रोजी ४:३० वाजण्याच्या सुमारास केज येथील पेट्रोल पंपावरुन डिझेल टाकले. त्यानंतर मालाची पाहणी करुन तो मांजरसुंबा येथे ५:३० वा. आला. चहा पिण्यासाठी उतरले तेव्हा गाडीमध्ये पाहिले असता त्यामध्ये भरलेल्या मालात ५ कट्टे तूर व एक कट्टा सोयाबीन आणि पंधरा किलो तुरीचे कट्टे दिसून आले नाहीत. ट्रक ड्रायव्हर जगदीश नारावत याने आजूबाजूला शोध घेतला. परंतु माल दिसला नाही. चालक जगदीश नारावत याने दि. २५ जुलै रोजी केज पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार अज्ञात चोरट्याविरुद्ध गु. र. नं. ४१३/ २०२४ भा. न्या.सं. ३०३ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस जमादार दत्तात्रय बिक्कड हे तपास करीत आहेत.

### राज्यातील प्रकल्पांना

योजनेंतर्गत बफर स्टॉकसाठी कांदाखरेदी करण्याबाबत धोरण निश्चित केले जावे, सोयाबीन आणि कापसाच्या हमीभावात वाढ करावी, दुधाची भेसळ रोखण्यासाठी कठोर कायदा करण्यासंदर्भात केंद्राने पावले उचलावीत, अशीही मागणी मुख्यमंत्री शिंदे यांनी केली.

### लाडकी बहीण'ची माहिती सादर

राज्यात राबवल्या जात असलेल्या योजना-प्रकल्प यांचा अहवाल सादर करण्याच्या सूचना निती आयोगाने राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना दिल्या होत्या. त्यानुसार शिंदे यांनीही राज्यातील 'लाडकी बहीण' योजनेची माहिती सादर केली. राज्यात सुरू असलेले पायाभूत सुविधांचे प्रकल्प तसेच, प्रशिक्षण भत्त्यासारख्या कल्याणकारी निर्णयांची माहितीही शिंदेंनी बैठकीत दिली.

### उपोषण करताच प्रशासन

मागण्या व मागिल उपोषणातील मागण्या मान्य करून प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली आहे व रोहन गलांडे पाटील यांनी उपोषणाला काम पुर्ण होईपर्यंत स्थगिती दिली यावेळी उपस्थित माजी आमदार पृथ्वीराज साठे, जेष्ठ नेते सुरेश तात्या पाटील, माजी सरपंच सुनील बापु देशमुख, मंडळ अधिकारी मस्के साहेब,तलाठी क्षीरसागर साहेब,जेष्ठ पत्रकार रामदासजी तपसे, ग्रामपंचायत सदस्य बालाजी राऊत, युवराज मगर सर, शिवाजी आबा गायकवाड,जेष्ठ शिवसैनिक लक्षीमन तात्या गलांडे, दत्ता पाटील गलांडे,अभियंता अतुल मुंडे, गुत्तेदार चंदनशिव, अशोकराव देशमुख, मुन्ना नखाते, भैरवनाथ हुंबे, जालिंदर हुंबे, बाळासाहेब घोडके व जेष्ठ , समाजसेवक व गावकऱ्यांच्या मदतीने अखेर रोहन गलांडे पाटील यांनी अमरण उपोषणाला काल स्थगिती दिली यावेळी बोलताना रोहन गलांडे यांनी म्हटले तीर्थक्षेत्र विकास कामाचे यश माझे नसुन लोकशाहीचा चौथा स्तंभ पत्रकार, संपादक, उपसंपादक , न्यूज, पोर्टल व सर्व सहकाऱ्यांचे आहे असे रोहन गलांडे यांनी म्हटले आहे

### माझी लाडकी बहीण

देताना ते पुढे म्हणाले की, महाराष्ट्राचा उपमुख्यमंत्री आणि राज्याचा अर्थ व नियोजन मंत्री म्हणून यंदाच्या २०२४-२५ च्या अतिरिक्त अर्थसंकल्पात मी स्वतःच 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना जाहीर केली आहे. वित्त व नियोजन, संबंधित विभाग तसेच राज्य मंत्रिमंडळाच्या मान्यतेनंतर या योजनेची घोषणा मी राज्याच्या अर्थसंकल्पात केली. चालू आर्थिक वर्षातील उर्वरीत नऊ महिन्यांसाठी आवश्यक एकूण ३५ हजार कोटी रुपयांच्या संपूर्ण रकमेची तरतूद यावर्षीच्याच अर्थसंकल्पात केली आहे. त्यामुळे योजनेसाठी पैसा कुठून आणणार ?, हा प्रश्नच उद्भवत नाही. महाराष्ट्रासारख्या आर्थिक संपन्न राज्याला एवढी रक्कम खर्च करणे शक्य आहे. राज्यातील माता-भगिनी-मुलींच्या आर्थिक स्वातंत्र्य, स्वावलंबन, पोषण व सर्वांगीण सक्षमीकरणासाठी, मान, सन्मान, स्वाभिमान वाढवण्यासाठी ही रक्कम खर्च करण्याची राज्य शासनाची तयारी आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

उपमुख्यमंत्री अजित पवार पुढे म्हणाले की, 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना जाहीर झाल्यानंतर तिला राज्यभर उदंड प्रतिसाद मिळत आहे. शासकीय यंत्रणा, राजकीय-सामाजिक-स्वयंसेवी संघटनांकडून शहरात आणि गावोगावी शिबिरं आयोजित करुन अर्ज भरुन घेतले जात आहेत. योजना जाहीर झाल्यानंतर गेल्या महिनाभरात राज्यात फिरताना गावागावातल्या लाभार्थी माता-भगिनींकडून मिळणारा प्रतिसाद, प्रेम आश्चर्यचकित करणारं आहे. या योजनेचं हे यश बघून विरोधकांच्या पोटात गोळा आला असावा. त्यामुळेच खोट्या बातम्या पेरल्या जात आहेत, असा आरोपही त्यांनी केला. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण'योजनेसारखी कुठलीही नवीन योजना जाहीर करत असताना त्या योजनेची अंमलबजावणी, कार्यान्वयन चांगल्या पद्धतीने व्हावं. प्रशासकीय खर्च कमी होऊन अधिकाधिक निधी लाभार्थी घटकांसाठी उपयोगात यावा, असा वित्त विभागाचा प्रयत्न असतो. त्यासाठी काही उपाययोजना सूचवल्या जातात. त्या सूचनांचा संदर्भ बदलून, चुकीचा अर्थ काढून माध्यमांमध्ये वित्त विभाग आणि राज्य शासनाबद्दल गैरसमज पसरवण्याचा, 'फेक नॅरेटीव्ह' निर्माण करण्याचा प्रयत्न विरोधकांकडून सुरु आहे. त्यांच्या प्रयत्नांना राज्यातील सुज्ञ जनता आणि पहिल्यांदाच अशा महत्वकांक्षी योजनेचा लाभ होणार आहे त्या माझ्या माता-भगिनी बळी पडणार नाहीत, याची खात्री आहे, असेही उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'ला वित्त विभागासह राज्यातील कुणाचाही विरोध असण्याचे कारण नाही, असूच शकत नाही. उलट या योजनेसाठी लागेल तो निधी देण्यास वित्त विभाग कटीबद्ध आहे. प्रसार माध्यमांमध्ये प्रसिद्ध झालेल्या बातम्या कपोलकल्पित, वस्तुस्थितीशी, विसंगत, राजकीय हेतूने प्रेरित आहेत. प्रसार माध्यमांनी अशा बिनबुडाच्या बातम्या देणे कृपया थांबवावे. राज्यातील कुणाचाही अशा बातम्यांवर विश्वास बसणार नाही, याची मला खात्री आहे. 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या यशस्वीतेसाठी अधिकाधिक भगिनींना यात सहभागी करून घेण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करूया, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

## पान सहा वरून

### तलावडा फाटा ते रेवकी देवकी, गोंदी

रस्त्यावर खड्डे पडले असून ते खड्डे चुकविण्याच्या नादात तसेच गाडी घसरून अनेकवेळा नागरिक पडत आहेत. शेतकऱ्यांना, महिलांना या रस्त्यावरून दररोज मोठी कसरत करावी लागत आहे. यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. या रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांना जीववित्वाला धोका निर्माण झाला आहे. सध्या पावसाळा सुरू असल्याने या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात चिखलाचे साम्राज्य असून रस्त्यावर मोठ मोठे खड्डे पडले आहे. या रस्त्यावरून प्रवास करताना वाहन चालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. चिखलामुळे वाहन घसरत आहे. वाहने फसत आहेत, या प्रकारामुळे या रस्त्यावर प्रवास करणारे नागरिक संतप्त झाले आहे. त्यामुळे या रस्त्यावर तात्काळ उपाययोजना करावे आणि गेल्या अनेक वर्षांपासून डांबरापासून वंचित असलेल्या रस्त्याला डांबरीकरण करावे अशी मागणी आता नागरिकांकडून होत आहे.

### कॉंग्रेस निवडीने जबाबदारी

व्यासपीठावर आमदार लहु कानडे जिल्हाध्यक्ष जयंत वाघ युवा नेते करण ससाणे मनोज गुंदेचा दशरथ शिंदे सुनील क्षेत्रे संजय गारुडकर सर अभिनय गायकवाड विकास भिंगारदिवे किशोर कोतकर चंदकांत उजगारे स्वप्निल पाठक संजय झिजे आदी सह कोंग्रेस कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते इंजि सुजित क्षेत्रे यांच्या निवडीचे नगर शहरात जोरदार स्वागत करण्यात आले

### राष्ट्रसंत भगवान बाबांच्या जयंतीनिमित्त

म्हणून सेवानिवृत्त शिक्षक तथा लेखक ए. तु. कराड, दै.परळी प्रहारचे मुख्य संपादक राजेश साबणे, दै. पुण्यनगरीचे तालुका प्रतिनिधी धनंजय आरबुने, साप्ताहिक समाचारचे मुख्य संपादक आत्मलिंग शेटे, दै. गांवकरी चे बीड जिल्हा प्रतिनिधी जगदीश शिंदे, परळी बातमीदारचे संपादक महादेव गित्ते, आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास पत्रकार बांधवांनी उपस्थित राहावे असे आवाहन आयोजक तथा संपादक रानबा गायकवाड, इंजि. भगवान साकसमुद्रे, दैनिक सोमेश्वर साथीचे संपादक बालासाहेब फड, सम्राट गित्ते आदींनी केले आहे.

### बंजारा समाजाच पोरगं

या साऱ्यांचा फुगा आता विधानसभेला आता फुटणार आहे. कारण पहिल्यांदाच तालुक्यातील जनतेचा मिळणारा प्रतिसाद पाहता सर्वसामान्य बहुजन जनता अण्णासाहेब राठोड यांच्या सोबत खंबीरपणे उभी आहे असे दिसून येत आहे.गेवराई विधानसभा मतदारसंघात विरोधकही कमी पडले आहेत. त्यामुळे आता सर्वसामान्य जनतेचे अण्णासाहेब राठोड हा उत्तम पर्याय उपलब्ध असल्याने गेवराई विधानसभेला परिवर्तन अटळ आहे.

### केज पोलिसांना अवैध धंद्यांना

शेतमजूर यांच्या कुटुंबाला मोठ्या प्रमाणात बसू लागला आहे. कित्येक शेतकरी व शेतमजुराची तरुण मुले व्यसनाधीन होऊ लागली आहेत. मटक्याच्या नादी लागून पैसे घालू लागले आहेत. दारू पिऊन घरात अशांतता निर्माण करीत आहेत. या दोन्हीच्या नादामध्ये मात्र कुटुंबातील पैसा बाहेर जाऊ लागला. कित्येक तरूण वाम मार्गाला लागत आहेत. आपल्या हद्दीतील गावागावात चालत असलेल्या अवैध धंद्यांना केज आणि यूसूफ वडगाव पोलिसांना आवर घालता येईना. यामुळे या तरुणांची उध्वस्त आयुष्याच्या दिशेने वाटचाल होऊ लागली आहे. ती केवळ आणि केवळ दोन्ही पोलीस ठाण्याच्या अधिकारी कर्मचा-यांमुळे असा स्पष्ट आरोप ग्रामस्थ करीत असून वरिष्ठ अधिकाऱ्यांना देखील याची जाणीव नसावी याबद्दल देखील शंका घेतल्या जात आहेत.

### गेवराई विधानसभेची

समाजाचे आहेत. सर्व सामान्य माणसाचा कैवार घेऊन, त्यांनी पत्रकारितेत शाश्वत भूमिकेतून बातमीदारी केली आहे. सर्व समाज बांधवांचा त्यांना पाठिंबा असून, मनोज दादा जरांगे-पाटील यांनी बीड जिल्ह्यातून गेवराई विधानसभेचा उमेदवार देताना, अल्पसंख्याक समाजातून पत्रकार अय्युब बागवान यांचा विचार करावा, अशी मागणी युवा नेते उद्धव मडके यांनी केली आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com

Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# लोकन्यायालयात ६०४ प्रकरणे निकाली

## कौतुकास्पद स्वत: न्यायाधीश वृध्दांचे म्हणणं ऐकायला बाहेर



पाटोदा/पुण्यभूमी प्रतिनिधी

मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार व मा. जिल्हा न्यायालयाचे सुचनेनुसार दिनांक २७/०७/२०२४ रोजी पाटोदा येथील न्यायालयात लोक न्यायालयाचे आयोजन करण्यात आले होते. त्यात एकुण ६०४ प्रकरणे निकाली काढण्या आली. त्यात एकुण ३६८१६५८ रुपयाची वसुली झाली. याबाबत अधिक माहिती अशी की, न्यायालयात प्रलंबित दिवाणी दावे दाखल पुर्व प्रकरणे, बँकेची कर्ज प्रकरणे, चेकबाबतची प्रकरणे, ग्रामपंचायत थकबाकी प्रकरणे, घरगुती कौटुंबीक वाद, पोटगीची प्रकरणे आणि तडजोडपात्र प्रकरणे हे सामोपचाराने आपसात तडजोड करण्यासाठी दिनांक २७.०७.२०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता लोकन्यायालयाचे आयोजन करण्यात आले होते. सदर न्यायालयात दिवाणी ८५ प्रकरणे, फौजदारी ९ प्रकरणे, बँकेचे ३३ प्रकरणे, तसेच ग्रामपंचायत थकबाकी ४७७ प्रकरणे ईत्यादी प्रकरणे निकाली काढण्यात आली. फौजदारी प्रकरणात रक्कम रुपये ११६२८०० आणि बँक व ग्रामपंचायतचे प्रकरणात थकबाकी रुपये २५,१८,८५८ अशी एकुण ३६८१६५८ रुपयाची वसुली करण्यात आली. या न्यायालयासाठी एकुण २ पॅनल तयार करण्यात आले होते. पॅनल क्रमांक १ वर श्रीमती एस. एन. निकम मॅडम, दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पाटोदा या होत्या पॅनल मेंबर विधीज्ञ बी. आर. लवुळ हे होते तसेच पॅनल क्रमांक २ वर श्रीमती ए. ए. पाटील मॅडम, सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पाटोदा या होत्या व पॅनल मेंबर विधीज्ञ बी.डी. तवार हे होते. हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी तालुका वकील संघ, पाटोदा यांच्या विधीज्ञांनी मोलाचे सहकार्य केले. या लोकन्यायालयात विधिज्ञांचा व पक्षकारांचा उत्स्फुर्त प्रतिसाद दिसुन आला.

### स्वत: न्यायाधीश वृध्दांचे जवळ

पाटोदा येथिल लोकन्यायालयात अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत.आजच्या लोक न्यायालयात काही वृध्दापकाळात असलेल्या नागरिकांचेही दावे आहेत.ते न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत.काही वृध्दांना चालताही येत नाही.अशांना नातेवाईकांनी वाहनांने न्यायालयात आणले होते. पॅनलसमोर येणे शक्य नसल्याने स्वतः न्यायाधीश श्रीमती निकम व श्रीमती पाटील यांनी स्वतः वाहनाजवळ येऊन न्यायाच्या प्रतीक्षेत असलेल्या वृध्दांचे म्हणणे ऐकले

# घोसला घरफोडीचा श्वान पथकाने तपास!

## भयभित : रात्री उशिरापर्यंत दाखल झाले पथक



घोसला/पुण्यभूमी प्रतिनिधी

घोसला घरफोडी प्रकरणी तपासणे वेग घेतला असून शनिवारी रात्री नऊ वाजता छत्रपती संभाजीनगर वरून ज्युलिया श्वान पथक दाखल झाले होते मात्र झालेल्या रिमझिम पावसामुळे चोरट्यांचा माग सापडू शकला नव्हताण

माजी पंचायत समिती चे सभापती चंद्रकांत पाटील यांच्या घरी कोणीही नसल्याने संधी साधून अज्ञान चोरट्यांनी डल्ला मारला होता त्यासाठी शनिवारी रात्री छत्रपती संभाजीनगर वरून विशेष श्वान पथक पाचारण करण्यात आले श्वान ज्युलिया ने घरात चोरट्यांचा माग घेवुन बाहेर येताच शनिवारी सायंकाळी झालेल्या पावसामुळे श्वानला माग आढळून आला नाही दरम्यान श्वान पथकात सहायक फौजदार नासेर पठाण श्रीकांत जोग श्वान ज्युलिया ठसे तज्ज्ञांनी मोहम्मद पठाण आर एल असावरे आदींनी घटनास्थळी ठसे घेतले पोलीस निरीक्षक पंकज बारवाल उपनिरीक्षक रजाक शेख जमादार राजू बर्डे रवींद्र तायडे दिलीप पवार हे घोसला गावात तळ ठोकून होते

# प्रेक्षकांच्या भेटीला येणार ‘बाबू’

## सांस्कृतिक : चित्रपटात अस्सल कोळी भाषेचा जलवा



अनिल चौधरी /पुणे

बाबू नाय, बाबू शेठ म्हणत, अस्सल कोळी भाषेचा जलवा दाखवणारा स्टायलिश ’बाबू’ लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकताच या चित्रपटाचा ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीला आला असून ट्रेलर पाहून प्रेक्षकांची ‘बाबू’विषयीची उत्सुकता अधिकच वाढली आहे. यात ‘बाबू’च्या आयुष्यातील प्रेम, शत्रु आणि सूडभावना, जबरदस्त ॲक्शन दिसत आहे. त्याच्या आयुष्यात नेमके काय होते, हे जाणून घेण्यासाठी प्रेक्षकांना हा चित्रपट पाहावा लागेल.

चित्रपटाचा ट्रेलर प्रेक्षकांना भावत असतानाच चित्रपटातील गाणीही संगीतप्रेमींच्या पसंतीस उतरत आहेत. विविध मूडची ही गाणी सध्या प्रचंड गाजत आहेत. ’बाबू’ टायटल सॉन्ग आणि त्याची हूकस्टेप सध्या भलतीच ट्रेंडिंगमध्ये आहे. तर ’फ्युचर बायको’ हे गाणेही अनेकांना नॉस्टेल्जिक करत आहे. टायटल सॉन्गला मंगेश कांगणे यांनी शब्दबद्ध केले आहे. तर संतोष मुळेकर याचे संगीत लाभलेले हे भन्नाट गाणे नकाश अजीज यांनी गायले आहे. तर ’फ्युचर बायको’ या गाण्याला क्षितिज पटवर्धन यांचे शब्द लाभले असून ऋषिकेश कामेरकर यांनी संगीतबद्ध केले आहे. अवधूत गुप्ते यांच्या दमदार आवाजाने हे गाणे अधिकच बहारदार बनले आहे. या दोन्ही गाण्यांना सध्या संगीतप्रेमींकडून भरभरून प्रतिसाद मिळत आहे. चित्रपटाबद्दल दिग्दर्शक मयूर शिंदे म्हणतात, मराठीत पहिल्यांदाच असा आगरी कोळी भाषेचा झणझणीपणा अनुभवायला मिळणार आहे. ९०च्या दशकातील ही कथा प्रेक्षकांना नोस्टॅल्जिक करणारी आहे तर तरूणाईला जुन्या काळातील प्रेमाचा अंदाज दाखवणारा हा चित्रपट आहे. यात प्रेम, मैत्री, दुरावा, शत्रुत्व, बदला, ॲक्शन अशा सगळ्याच गोष्टी आहेत. चित्रपटातील गाणीही वेगवगेळ्या धाटणीची आहेत, त्यामुळे संगीतप्रेमीही नक्कीच खुश होतील. त्यामुळे ’बाबू’ हे मनोरंजनाचे हे एक परिपूर्ण पॅकेज आहे.’’

श्री समर्थ कृपा प्रोडक्शन प्रस्तुत ’बाबू’ या चित्रपटाची निर्मिती सुनीता बाबू भोईर यांनी केली आहे. तर या चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शनाची धुरा मयूर मधुकर शिंदे यांनी सांभाळली आहे. अंकित मोहन, नेहा महाजन, रुचिरा जाधव, स्मिता तांबे , संजय खापरे, श्रीकांत यादव यांच्या या चित्रपटात प्रमुख भूमिका असून येत्या २ ारस्टला ‘बाबू’ प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

# पाटोदा शहरात साहित्य सम्राट महोत्सव

## समिती : अण्णाभाऊ साठेंच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम



पाटोदा/पुण्यभूमी प्रतिनिधी

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०४ व्या जयंतीनिमित्त पाटोदा शहरात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे असे साहित्य रत्न आण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष नितिन अडागळे व पाटोदा नगरपंचायत चे सभापती किशोर अडागळे यांनी सांगितले आहे.

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीचे आयोजन प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी उत्साहात होणार आहे.पाटोदा नगरपंचायत चे सभापती किशोर अडागळे यांच्या मार्गदर्शनाखाली या जयंतीचे आयोजन करण्यात आले आहे.या जयंतीनिमित्त दि १आगष्ट रोजी सकाळी ठिक ९.३० वा माजी मंत्री सुरेशआण्णा धस यांच्या हस्ते ध्वजारोहण होणार आहे.या कार्यक्रमास पाटोदा तहसिलदार निलावाड साहेब, पाटोदा पोलिस निरीक्षक अनमोल केदारसाहेब, नगराध्यक्ष सौ जाधव, उपनगराध्यक्ष शरद बामदळे,सर्व सभापती, मान्यवर नगरसेवक, मान्यवर सर्वपक्षिय पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.तर सायंकाळी सहा वाजता भव्यदिव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे.या जयंतीनिमित्त पाटोदा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात, डॉ बाबासाहेब आंबेडकर चौकात तसेच आण्णाभाऊ साठे चौकात सुशोभीकरण करण्यात आले आहे.याकार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी.न.प.सभापती किशोर अडागळे याच्या मार्गदर्शनाखाली जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष .नितीन आडागळे. व उपाध्यक्ष रवी अडागळे. सचिव किशोर सुदाम अडागळे. कोषाध्यक्ष सुमित अडागळे सहसचिव वैभव गायकवाड. संघटक आकाश अडागळे व सदस्य साठेनगर मित्र मंडळ व समाज बांधव व विजय अडागळे. योगेश सानप .प्रवीण अडागळे. पवन अडागळे. नितीन अडागळे . अरविंद सरोदे .अजित अडागळे आकाश खवले. सनी अडागळे चेतन जावळे. प्रणव जावळे.हे परिश्रम घेत आहेत.

# तलवाडा ग्रामपंचातचे विकासाकडे दुर्लक्ष!

## निवेदन : घाणीचे साम्राज्य पसरले नागरिकांचे आरोग्य धोक्यात

तलवाडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा ग्रामपंचायत सर्वात मोठी असल्याची व मोठे बाजार पेठची ग्रामपंचायत मानली जाणारी तलवाडा ग्रामपंचायत आहे. तलवाडा ग्रामपंचायतचे हलगर्जीपणामुळे तलवाडा गावात घाणीचे साम्राज्य व नळाला पाणी येत नसल्याचे मोठ्या प्रमाणात सर्वसामान्य नागरिकांतून आरडा वरडा होत आहे.

परंतु या सर्व विषयाची गंभीरता सरपंच उपसरपंच ,सदस्यांना, काही घेणे देणे नाही तलवाडा गावातील मतदारांनी तलवाडा ग्रामपंचायत येथील सरपंच. उपसरपंच. सदस्यांना .निवडून देऊन मोठा पायावर दगड मारून घेतल्यासारखे झाल्याचे बोलले जात आहे. तलवाडा येथील गणेशनगर, अंबिकानगर सह संपूर्ण गावातील सांडपाण्याचे योग्य ते नियोजन नसल्यामुळे रस्त्यात चिखल व घाणीचे साम्राज्य निर्माण झाले असून यामुळे रोगराईचे प्रमाण वाढले आहे. लहान मुलांना आजाराचा सामना करावा लागत असून नागरिकांना विविध प्रकारच्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. नळाला पाणी सुद्धा पंधरा- पंधरा दिवस सुटत नाही. अशा अनेक समस्यांबद्दल तलवाडा ग्रामपंचायतचे ग्रामविकास अधिकारी पाटील, व उपसरपंच आक्रम सौदागर यांना ग्रामस्थांनी निवेदन देऊन सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. निवेदन देताना स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे युवा उपजिल्हाध्यक्ष - शेख खिजर सौदागर, रमेश नाटकर, शिवसेना गेवराई उपाध्यक्ष शेख रफिक, लहुजी साळवे बहुजन क्रांती सेनेचे जिल्हाध्यक्ष - दादाराव रोकडे, पत्रकार बापु गाडेकर, प्रा. विजय हातागळे, राजू शेख, उमेश हातागळे, बाळू शिंनगारे आदीजण उपस्थित होते.

# अज्ञाताने कपाशीवर फवारले तण नाशक!

## नुकसान : नांदगाव शिवारात खोडसाळपणा



घोसला/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयगाव तालुक्यातील नांदगाव शिवारात अज्ञातांनी खोडसाळपणा करून वीस एकर क्षेत्रापैकी पाच एकर क्षेत्रावरील कपाशीच्या पिकांवर तण नाशक फवारणी केल्याची घटना शुक्रवारी उघडकीस आली याप्रकारामुळे शनिवारी पाच एकर वरील कपाशीची पिके जळून उध्वस्त झाली आहे याप्रकरणी अज्ञात विरुद्ध सोयगाव पोलीस ठाण्यात शनिवारी तक्रार दिली आहे

नांदगाव शिवारात साहेबराव निंबाळकर यांची गट क्र ७० ठोक्याने केलेली वीस एकर शेती आहे या वीस एकर क्षेत्रात त्यांनी कपाशी ची लागवड केली आहे गुरुवारी शुक्रवारी अज्ञातांनी त्यांच्या शेतात खोडसाळ पणाने तण नाशक फवारणी केली त्यातील पाच एकरवरील कपाशीची पिके उभी जळून गेल्यचा प्रकार शनिवारी सकाळी साहेबराव निंबाळकर यांना आढळून आला दरम्यान शेतकरी साहेबराव निंबाळकर यांनी नुकतीच बुधवारी वीस एकर वर कपाशी पिकांवर कपाशी रोगमुक्त व निरोगी राहण्यासाठी इतर औषधं फवारणी केली होती मात्र शनिवारी त्यांना पाच एकर वरील कपाशी जळून गेल्याचे आढळून आले व इतर पंधरा एकर कपाशी टवटवीत दिसली त्यामुळे अज्ञातांनी खोडसाळ पणा करून नुकसान केल्याची तक्रार साहेबराव निंबाळकर यांनी दिली आहे.

# मतदार संघ राष्ट्रवादी काँग्रेसला सोडा

## शिष्टमंडळ: राष्ट्रवादीकडून शरद पवार यांना निवेदन



सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयगाव - सिल्लोड विधानसभा मतदार संघ महाविकास आघाडीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला सोडा अशी मागणी शनिवारी सकाळी दहा वाजता सोयगाव तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शिष्टमंडळाने अध्यक्ष शरद पवार यांची छत्रपती संभाजीनगर येथे भेट घेऊन केली आहे या मागणीवर अध्यक्ष शरद पवार यांनी महाविकास आघाडी मध्ये लोकसभेप्रमाणे एकजुटीने काम करा तुमच्या मागणीचा नक्कीच विचार करू असे आश्वासन दिल्या मुळे जेष्ठनेते रंगनाथ काळे यांच्या विधानसभा उमेदवारी वर शिक्कामोर्तब झाले आहे

सोयगाव तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष डॉ इंद्रजित सोळुंके शहराध्यक्ष रवींद्र काळे दिपक देशमुख कृष्णा जुनघारे शरद दामोदर योगेश महाकाळ सुधाकर सोहनी आदींच्या शिष्टमंडळाने शनिवारी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेवून मागणीचे निवेदन सादर केले यामध्ये सोयगाव- सिल्लोड विधानसभा मतदार संघ महाविकास आघाडीत राष्ट्रवादी काँग्रेसला सोडून जेष्ठनेते रंगनाथ काळे यांना उमेदवारी द्या अशी थेट मागणी तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे वतीने करण्यात आली आहे.

यावर तालुकाध्यक्ष डॉ इंद्रजित सोळुंके शहराध्यक्ष रवी काळे शरद दामोदर आदींच्या स्वाक्षरी आहे दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेसकडे हा मतदार संघ सोडू परंतु कार्यकर्त्यांनी आतापासूनच कामाला लागा असे आश्वासन दिल्या मुळे तालुका राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.

या आश्वासन मुळे रंगनाथ काळे यांच्या सोयगाव सिल्लोड च्या उमेदवारीच्या आशा उंचावल्या आहे त्यामुळे सोयगाव चा स्थानिक उमेदवार आता विधानसभा निवडणुकीत दिसणार आहे अशी चर्चा रंगू लागली आहे.

## राजेंद्र मस्के औरंगाबादमध्ये लोककलावंतांचा मेळावा!

# कलावंतांच्या घरकुलांचा प्रश्न मार्गी लागेल




बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

लोककला समाजाचे सांस्कृतिक जीवन प्रतिबिंबित करतात. महाराष्ट्राला लोककलेचा फार मोठा सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे. तिचे अस्तित्व आणि संवर्धन करण्यासाठी भाजपा महायुतीचे राज्य सरकार कटीबद्ध आहे. मानधनात दुप्पट वाढ करून, संस्कृतीक मंत्री मूनगुंटीवार यांनी कलावंतांना मोठा आर्थिक आधार दिला. राजाश्रयाशिवाय लोक कलावंतांचे कल्याण होणार नाही. कल्याणकारी निर्णय व्हावेत यासाठी १७ ऑगस्ट २०२४ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे राज्याचे सांस्कृतिक मंत्री सुधीर मूनगुंटीवार व मान्यवरांच्या उपस्थितीत राज्यस्तरीय लोककलावंतांचा मेळावा संपन्न होत आहे. या मेळाव्यात प्रत्येक लोककलावंतानी घरकुल मिळावे यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय होईल अशी अपेक्षा भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी व्यक्त केली. लोक कलावंतांच्या भव्य मेळावा नियोजानासाठी आज संघर्षयोद्धा भाजपा संपर्क कार्यलय बीड येथे भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, महाराष्ट्र प्रदेश सचिव, लोक कलावंत प्रकोष्ठ प्रमुख गणेश दहिफळे यांच्या प्रमुख उपस्थितीत मराठवाड्यातील कलावंतांची बैठक संपन्न झाली.या मेळाव्यास लोक कलावंत समिती मराठवाडा अध्यक्ष सुमित धुमाळ, वृद्ध कलाकार मानधन समिती सदस्य कैलास काटे, सांस्कृतिक प्रकोष्ठ जिल्हा संयोजक प्रमोद रामदासी, रामदास कदम, काशिनाथ उबाळे, शाम धोंगडे, रामदास धुमाळ, अशोक जाधव, तुकाराम ठोंबरे, परमेश्वर कराड, मोठे नाना, प्रभाकर महाराज कुटे, सिद्धेश्वर शिंदे, संजीवनी ताई, शेळके महाराज गैदास उगले, पत्रकार सचिन भंडारे, लिंबाजी ढवळे, भास्कर कांबळे, रामनाथ काटे, विलास काटे, मुरलीधर तरटे, अंकुश गरडकर, यांच्यासह लोक कलावंत मोठ्या संखेने उपस्थीत होते.

# पिंपळोद झेडपी शाळेत शिक्षण सप्ताह

## धोरण : विद्यार्थ्यांचा उत्साह द्विगुणीत



यवकमाळ/पुण्यभूमी प्रतिनिधी

अमरावती-पिंपळोद येथील जि.प.कन्या शाळा, उर्दू शाळा व जि.प.मुलांची शाळा या तिनही शाळांमध्ये शिक्षण सप्ताह या केंद्रपुरस्कृत कार्यक्रमाची सुरुवात २२ तारखेपासून झाली आहे. पहिल्या दिवशीशैक्षणिक साहित्य निर्मिती, गोष्टी कट्टा, प्राणी, पक्षी, अन्न आणि भाजीपाला यांचे कार्ड बनवण्याचा उपक्रम घेण्यात आला. याच उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पनेतूनसुंदरमुखवटे तयार केले. तसेच विद्यार्थ्यांनी ससा आणि कासव यांच्या गोष्टीचे सुंदर नाट्यीकरणसुद्धा करून दाखवले. दुस-या दिवशी पायाभूत साक्षरता व संख्याज्ञानयावर आधारित विविध उपक्रम घेण्यात आले. भौमितिक आकृत्याचे रेखाटन, अंकांची गाणी म्हणणे, ग्रंथालय पुस्तक वाचन, गोष्टींचे सादरीकरण आणि कथाकथन इ. उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. शैक्षणिक साहित्य प्रदर्शनी भरवून शैक्षणिक साहित्य निर्मितीचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले. सलग ७ दिवस हा शिक्षण सप्ताह सुरु राहणार असून क्रीडा, कला नि कौशल्यावर आधारित उपक्रम, गणितीय खेळ, शालेय पोषण आहार दिवस, तिथी, भोजन इ. प्रकारचे उपक्रम शाळेत घेण्यात येणार आहेत. या उपक्रमात शाळेतील शिक्षकआणि पालकसुद्धा सहभागी होऊन विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवित आहेत.

**सुविचार**-मोत्याच्या हारापेक्षा घामाच्या धारांनी मनुष्य अधिक शोभून दिसतो.

# कट्टरतावाद कोणत्या दिशेने....?

सध्या उत्तर प्रदेशमधील प्रसिद्ध कावड यात्रा विशेष चर्चेत आहे. या यात्रा मार्गावरील दुकानदारांनी आपली ओळख दुकानाच्या पाटीवर दर्शवावी असा आदेश उत्तर प्रदेश सरकारने काढला आणि वादाला सुरुवात झाली. प्रकरण थेट सर्वोच्च न्यायालयात गेले. सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारच्या निर्णयाला सुरुवातीला स्थगिती दिली; परंतु उत्तर प्रदेश सरकारने पुन्हा एकदा सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाला आव्हान दिले. त्यावर झालेल्या सुनावणीनंतर सर्वोच्च न्यायालयाने उत्तर प्रदेश सरकारचा युक्तिवाद फेटाळून लावत अशा प्रकारे कुणावर त्यांची नावे जाहीर करण्याची जबरदस्ती करता येणार नाही, असे स्पष्ट शब्दांत बजावले. उत्तर प्रदेशात कावड यात्रेला खूप महत्त्व आहे. या यात्रेच्या निमित्ताने लाखो भाविक श्रावण महिन्यात गंगाजलाने भगवान शंकराला जलाभिषेक करतात. हरिद्वार, गोमुख, उत्तराखंडमधील गंगोत्री आदी ठिकाणांहून गंगाजल घेतले जाते. तेथून ते काशी विश्वनाथ, पुरा महादेव, मेरठ आदी ठिकाणच्या प्रसिद्ध शिवमंदिरांमध्ये जलाभिषेकासाठी कावडीतून आणले जाते. या यात्रा मार्गाच्या दोन्ही बाजूला दुकाने, उपहारगृह असतात. यात्रेकरूंना या ठिकाणी जेवणही दिले जाते. याच दुकानांवर त्यांच्या मालकाचे व कर्मचाऱ्यांचे नाव असणाऱ्या पाट्या असाव्यात, असा आदेश उत्तर प्रदेश सरकारने काढला होता. त्यापाठोपाठ मध्य प्रदेश व उत्तराखंड सरकारनेही असाच आदेश जारी केला. नाव जाहीर केल्यामुळ दुकानदार वा कर्मचारी कोणत्या जाती-धर्माचे आहेत हेही पर्यायाने जाहीर होत असून हा निर्णय समाजामध्ये तेढ निर्माण करण्यासाठी कारणीभूत ठरू शकतो, अशी भूमिका दुकानमालक आणि त्यांना समर्थन करणाऱ्या याचिकाकर्त्यांची होती. उत्तर प्रदेश सरकारने, यात्रेदरम्यान आपण कोणत्या प्रकारचे जेवण खातोय, यासंदर्भात कावड यात्रेकरूंना माहिती असावी आणि त्यात पारदर्शकता यावी म्हणून हा आदेश जारी केला. त्यांच्या धार्मिक श्रद्धा लक्षात घेता त्यात चुकूनही काही अडचण येऊ नये, यासाठी हे केले, असा युक्तिवाद केला होता. उत्तर प्रदेश सरकारच्या अन्न सुरक्षा कायद्यानुसार अशा प्रकारच्या स्टॉलधारकांनी त्यांची माहिती जाहीर करणे क्रमप्राप्त आहे, असाही दावा उत्तर प्रदेश सरकारने केला होता. सर्वोच्च न्यायालयाने उत्तर प्रदेश सरकारचे हे सगळे तर्क फेटाळून लावले. उत्तर प्रदेश सरकारची ही भूमिका कट्टरतावादाला खतपाणी घालणारी आहे, यात शंका नाही. भाजपचे राजकारण ध्रुवीकरणाच्या पायावरच उभे आहे. त्यात योगी सरकार सत्तेवर आल्यापासून उत्तर प्रदेश या ध्रुवीकरणाच्या राजकारणाची कर्मभूमी ठरला आहे. मागच्या दोन लोकसभा निवडणुकीत हे ध्रुवीकरणाचे राजकारण चांगलेच यशस्वी ठरले; परंतु यावेळच्या लोकसभा निवडणुकीत मतदारांनी धार्मिक अस्मिता पोटाच्या भूकेपेक्षा मोठी नसते, हाच संदेश मतपेटीच्या माध्यमातून भाजपला दिला. योगी आदित्यनाथ यांच्या कारकिर्दीत उत्तर प्रदेशात हिंदुत्वाचा प्रभाव वाढविण्याचे पुरेपूर प्रयत्न होत आहेत. योगी सरकारच्या अनेक कारवाया स्थानिक अल्पसंख्याकांच्या मनात दहशत निर्माण करणाऱ्या ठरल्या. त्याच मालिकेत या निर्णयाकडे पाहावे लागेल. वास्तविक याच उत्तर प्रदेशमध्ये यावेळी भाजपला लोकसभा निवडणुकीत सगळ्यात मोठा झटका बसला. संपूर्ण ८० जागा जिंकण्याचे स्वप्न पाहणाऱ्या भाजपला उत्तर प्रदेशातील मतदारांनी थेट ३३वर नेऊन ठेवले. भाजपपेक्षा समाजवादी पक्षाच्या अधिक जागा आल्या. या दणक्यानंतर तरी धार्मिक तेढ निर्माण करून आपले राजकारण साधण्याच्या भाजपच्या नीतीला खिळ बसेल असे वाटत होते; परंतु तसे झाल्याचे दिसत नाही. या आधी मुस्लिमांना थेट लक्ष्य केले जात होते, यावेळी रणनीती थोडी बदलल्याची दिसते. मुस्लिमांवर आर्थिक बहिष्कार टाकण्याचे डावपेच कितपत यशस्वी ठरू शकतील याची चाचपणी योगी सरकारच्या या निर्णयातून होत असल्याचे दिसते. वास्तविक ही यात्रा गेल्या अनेक वर्षांपासून नियमितपणे केली जात आहे. आजवर यात्रेदरम्यान कुठेही चुकीचे अन्न आणि तेही जाणीवपूर्वक कावडियांना दिल्या गेल्याचे एकही उदाहरण समोर आले नाही. यात्रेचा मार्ग मुस्लिमांची दाट वस्ती असलेल्या भागांतून जातो. कावडियांची संख्या लाखोच्या घरात पोहोचली आहे; परंतु आजपर्यंत कोणत्याही प्रकारची तक्रार आली नव्हती. उलट या भागांतील मुस्लीम रहिवासी नेहमीच कावडियांच्या गरजा भागवताना दिसतात. मग,अचानक असे काय घडले की ज्यामुळे योगी सरकारने मुझफ्फरनगरमधील पोलिसांनी दिलेल्या आदेशाला मान्यता दिली आणि दुसऱ्याच दिवशी ते आदेश उत्तर प्रदेशातून जाणाऱ्या यात्रा मार्गावरील सर्व पोलीस ठाण्यांत लागू करण्यात आले? हा नवा सामाजिक, आर्थिक दहशतवादाचा तर प्रकार नाही. तसे असेल तर कट्टरतावाद आता वेगळ्या आणि अधिक घातक दिशेने पुढे जाऊ पाहत आहे, असेच म्हणावे लागेल.

# प्रदूषणमुक्त सोहळा ....!

'द ग्रेटेस्ट शो ऑन द अर्थ' म्हणून ज्याचे सार्थ वर्णन केले जाते तो ऑलिम्पिक सोहळा यावेळी फ्रान्सची राजधानी पॅरिसमध्ये साजरा होत आहे. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये संपूर्ण जगभरातील जवळपास १५ हजार खेळाडू सहभागी होणार आहेत. या खेळाडूंच्या सोई-सुविधांची व्यवस्था ठेवण्यासाठी ४५ हजार स्वयंसेवक तैनात करण्यात आले आहेत, शिवाय देशोदेशीचे पत्रकार, अन्य माध्यमकर्मी यांचीही गर्दी तिथे होणार आहे. या खेळांचा आनंद लुटण्यासाठी देशविदेशातून एक कोटीपेक्षा अधिक पर्यटक पॅरिसमध्ये दाखल होतील असा अंदाज वर्तविण्यात येत आहे. एकूणच हा सगळा सोहळा अगदी भव्यदिव्य असणार आहे. पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेदरम्यान पर्यावरणाच्या दृष्टीने विशेष काळजी घेतली जाणार आहे. ऑलिम्पिक स्पर्धेला सुरुवात होण्यापूर्वी पॅरिसमध्ये मोठे आंदोलन झाले होते. पॅरिसमधून वाहणाऱ्या सिन नदीच्या प्रदूषणाबाबत लोकांनी रोष व्यक्त केला होता, त्यानंतर फ्रान्स सरकारने सिन नदी प्रदूषणविरहित करण्यासाठी बरेच प्रयत्न केले. दरवेळी ऑलिम्पिक स्पर्धेदरम्यान कार्बनचे उत्सर्जन हा मोठा वादाचा मुद्दा ठरत असतो, पर्यावरणवाद्यांचा त्यामुळेही या आयोजनला विरोध होता; परंतु यावेळी पॅरिस ऑलिम्पिकमध्ये कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण निम्म्यावर आणण्याचे ध्येय आयोजन समितीने ठेवले आहे. ऑलिम्पिकसारख्या स्पर्धांच्या आयोजनामुळे हरितगृह वायूचे उत्सर्जन मोठ्या प्रमाणावर होते. त्यामुळे अशा प्रकारच्या आयोजनांमध्ये पर्यावरणाची काळजी घेतली जाणे आवश्यक ठरते. तशी विशेष काळजी यावेळी घेतली जात आहे. हवामान बदलाकडे आणि त्यातून होणाऱ्या पर्यावरणाच्या ऱ्हासाकडे जगाचे लक्ष वेधण्यासाठी ऑलिम्पिकसारखी स्पर्धा नक्कीच मोठे माध्यम ठरू शकते. त्यामुळेच या स्पर्धेच्या माध्यमातून संपूर्ण जगाला पर्यावरण जपण्याचा संदेश देण्याचा आयोजकांचा प्रयत्न आहे. त्यासाठी या स्पर्धेदरम्यान भोजनात वनस्पती-आधारित, स्थानिक व शाश्वत अन्नपदार्थांचा प्रचार करण्यात येणार आहे, शिवाय ही स्पर्धा झाल्यानंतर खाद्यपदार्थांच्या निर्मितीसाठी वापरण्यात आलेल्या सगळ्या पायाभूत सुविधांचाही पुनर्वापर केला जाणार आहे. स्पर्धेच्या बहुतेक स्थळांवर पोहोचण्यासाठी सार्वजनिक वाहतुकीची सुविधा सहज उपलब्ध आहे. पॅरिसमध्ये एक हजार किमीच्या सायकल मार्गिकादेखील विकसित केल्या गेल्या आहेत. खेळांदरम्यान शहरात वावरण्यासाठी म्हणून तीन हजार सायकल्स भाड्याने वापरण्यासाठी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

## चौफेर

# भाजपा का करत आहे पराभवाची पायाभरणी!




आनंद आंबेकर
9850388613
कार्यकारी संपादक, देशोन्नती


भाजपने विरोधकांना व्यक्तीशः टार्गेट न करता भाजपचे किंवा महायुतीचे व्हिजन सांगितले, तर ते मतदारांना अधिक अपिल होईल, हे तितकेच खरे. नाहीतर पुण्याचा मेळावा म्हणजे भाजपच्या विधानसभा पराभवाची पायाभरणी ठरेल, हे वाक्य सत्यात उतरेल..

शीर्षक वाचून जरा आश्चर्य वाटले असेल... होय ना! पण माझ्या मते यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. जो राजकीय जाणकार आहे किंवा सूज्ञ मतदार आहे त्यांना भाजप नेत्यांची भाषणे आणि वक्तव्यावरून पक्षाचा पराभव समोर दिसतो आहे. ज्या चुका भाजपने लोकसभा निवडणुकीच्या वेळी केल्या, त्याचेच रीपिटेशन होत असल्याचे आणि हीच रणनीती यापुढेही राहणार असल्याचे पुण्यातील मेळाव्याने स्पष्ट केले. एकंदरच पुण्यातील मेळावा हा भाजपच्या विधानसभा निवडणुकीतील पराभवाची पायाभरणी करणारा ठरला, असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

'पराभवाची पायाभरणी' हा शब्द भाजपच्या प्रत्येक कार्यकर्त्याला जिव्हारी लागणारा आहे; पण असे मी का म्हणतोय याचा जरा खोलात जाऊन विचार करू या. प्रत्येक भाजप कार्यकर्ता आणि नेत्यांनीसुद्धा याचा विचार करायलाच हवा.

तीन महिन्यांत विधानसभा निवडणुका आहेत. त्यादृष्टीने विविध पक्षांची तयारी सुरू झाली. महायुतीने यात आघाडी घेतल्याचा उल्लेख मागील चौफेरमध्ये केला होता. अजित पवारांची राष्ट्रवादी असेल, शिंदेंची सेना असेल यांच्यासह भाजपनेही रणनीती आखली. त्याची अंमलबजावणीही सुरू झाली. मात्र, लोकसभेत महाराष्ट्रात झालेल्या दारूण पराभवाने भाजप विधानसभेसाठी रणनीती बदलेल असे प्रत्येकाला वाटणे साहजिक आहे. पराभवानंतर भाजपच्या मंथन बैठका झाल्या. पराभवाची कारणे शोधली गेली. मात्र, हा पराभव आपल्यामुळे झालाच नाही, असे म्हणून नेत्यांनी हात झटकला, कारण पराभवाच्या कारणांची स्क्रिप्ट वरून लिहून आली होती. 'फेक नरेटिव्ह' हे सोयीस्कर कारण देण्यात आले. संविधान बदलण्याचा भाजपचा डाव आहे हा विरोधकांनी उचललेला मुद्दा आला कोठून, हे खरंच भाजप नेत्यांना माहिती नाही का? भाजपचे नेते निवडणुकीपूर्वी काय बरळले, हे देशाला माहिती असताना विरोधकांनी उचललेला मुद्दा 'फेक' कसा असू शकतो? भाजपच्या नेत्यांमुळे विरोधकांना तो मुद्दा मिळाला आणि त्याचा योग्य आणि प्रभावी वापर करण्यात विरोधक यशस्वी ठरले. त्यामुळे विरोधकांनी सेट केलेल्या 'फेक नरेटिव्ह'मुळे पराभव झाला हे कारण हास्यास्पद आहे. जी कारणे भाजप शोधू शकला नाही किंवा शोधली असतीलही; पण ते सांगण्यास इच्छुक नाही ती कारणे वेगळीच आहेत. भाजप नेत्यांची बेताल वक्तव्ये, महाराष्ट्रातील नेत्यांना खालच्या भाषेत संबोधणे आणि आदल्या दिवशी भ्रष्टाचाराचा आरोप केल्यानंतर दुसऱ्या दिवशी त्या नेत्याला पक्षात सामावून घेणे, दुसऱ्याच्या घरात सुरुंग लावणे, ही भाजपनीती मराठी माणसाला रुचली नाही. ५० दशके संसदीय राजकारणात घालविणाऱ्या शरद पवार यांच्यासारख्या ज्येष्ठ व्यक्तीला 'भटकती आत्मा' म्हणणे, उद्धव ठाकरे यांना 'नकली बेटा' म्हणणे भाजपच्या अंगलट आले, ही खरी कारणे आहेत. तरीही भाजप पुन्हा त्याच चुका करते आहे.

कालपरवा पुण्यात झालेल्या मेळाव्याच्या निमित्ताने भाजपने विधानसभा निवडणुकीचे रणशिंग फुंकले. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी कार्यकर्त्यांमध्ये प्राण फुंकण्याचा प्रयत्न केला. हे करताना जे करायला नको, पुन्हा तेच केले. शरद पवार यांच्यावर त्यांनी पुन्हा तोफ डागली. 'भ्रष्टाचाऱ्यांचे सरदार' म्हणत पुन्हा एकदा आपले हसे करवून घेतले. शाह यांच्या या वक्तव्याची हवा खासदार सुप्रिया सुळे यांनी एका मिनिटात काढून टाकली. 'जर शरद पवार हे भ्रष्टाचाऱ्यांचे सरदार आहेत आणि हे जर मोदी सरकारला माहिती आहे, तर त्याच मोदी सरकारने पवार यांना पद्मविभूषण हा सन्मान का दिला? याची चौकशी व्हायला हवी.'

शरद पवार यांच्यावर यापूर्वीही भ्रष्टाचाराचे आरोप झाले. १९८५ च्या सुमारास बाळासाहेब ठाकरे यांनी आरोप केले. गोपीनाथ मुंडे यांनीही आरोप केले. शरद पवारांचे गुन्हेगारांशी संबंध असल्याचा आरोप बृहन्मुंबई महानगरपालिकेचे तत्कालीन उपायुक्त खैरनार यांनी केले तेव्हा खळबळ उडाली होती. ट्रकभर पुरावे द्यायला ते तयार होते; पण पवार यांच्यावरील एकही आरोप सिद्ध झाला नाही. भाजप- सेना युतीचे पहिले सरकार जेव्हा राज्यात आले तेव्हा शरद पवारांनी त्यांच्याकडे असलेल्या अपक्ष आमदारांना तिकडे पाठवले म्हणून ते सरकार आले हा इतिहास आहे. मात्र, शरद पवार स्वतः आपल्याकडे किंवा आपल्यासोबत का येत नाही हे शल्य आताच्या भाजप नेत्यांना आहे आणि त्या नैराश्यातून अमित शाह त्यांच्यावर पुन्हा पुन्हा आरोप करत आहेत. हे आता विधानसभा निवडणुकीपर्यंत असेच सुरू राहिले किंवा हीच रणनीती असेल तर भाजपचा पराभव अटळ आहे, हे राज्यातला कुठलाही तटस्थ व्यक्ती सांगेल. देवेंद्र फडणवीस यांनीही भाषा बदलायला हवी. 'ठोकून काढा' अशी भाषा गृहमंत्री असलेल्या फडणवीसांना शोभत नाही. त्या वाक्याचा मथितार्थ वेगळा असला, तरी आपणच विरोधकांना हातात कोलीत देतोय, हे त्यांना समजायला हवे. भाजपने विरोधकांना व्यक्तीशः टार्गेट न करता भाजपचे किंवा महायुतीचे व्हिजन सांगितले, तर ते मतदारांना अधिक अपिल होईल, हे तितकेच खरे. नाहीतर पुण्याचा मेळावा म्हणजे भाजपच्या विधानसभा पराभवाची पायाभरणी ठरेल, हे वाक्य सत्यात उतरेल.



## वर्तमान

# शिस्तीत विद्यार्थी! बेशिस्त मंडळ!! बेफिकीर शासन!!!


आशिष अंबुलकर
7083960056


काहीच कारण नाही अतिवैचारिक होऊन खचून जायचे वगैरे! मागील एक- दोन महिन्यांच्या बातम्या ज्या कानावर पडत आहेत.. 'NEET', 'UPSC' यांनी त्यांची प्रतिष्ठा दावणीला टांगली. त्यात अनेक विद्यार्थी, पालक अगदी होरपळून जातील असलेच भयंकर सत्य व बातम्या कानावर पडत आहेत. अत्यंत कठीण या परीक्षा व अतोनात मेहनत घेणारे विद्यार्थी व आभाळाएवढी अपेक्षा ठेवणारे यांचे आई- वडील!! स्वप्ने अस्तित्वात उतरविण्याची या भाबड्या लोकांची जिद्द!

साधारणपणे इयत्ता आठवीपासून झटावे लागते NEET च्या तयारीला, इतक्या कोवळ्या वयात ध्येय ठरवतात ही चिमुरडी. अखंड पाच वर्षे दीर्घ मेहनत केल्यावर, परीक्षा उत्तीर्ण होणे, तसेच रँक मिळविणे याची घाई व त्याचवेळी यांच्या मंडळाने केलेला प्रताप यामुळे फेर-परीक्षा, फेर-मूल्यांकन इत्यादी कारभार..या सर्व प्रक्रियेत ही १७-१८ वर्षांची चिमुरडे विद्यार्थी व त्यांची मानसिकता याचा सरकारने कधीच-कधीच विचार केलेला नसेल, कारण सामान्य लोक ही परीक्षा देऊन काय मिळवित असतात हे सरकार किंवा त्यांचे प्रतिनिधी कधीच समजू शकणार नाही, कारण सरकार हे 'सामान्य' नसते, ते 'विशेष' असते.

तसेच ळझएण.. लोक का बरे UPSC करीत असावीत.... IAS, IPS असली पदे मिळवावयाची असतील, तर भयंकर जिद्द, चिकाटी, असावी लागते.. का बरे ती जिद्द, ती आव्हाने ही सामान्यांची पोरं जोपासत असावीत. मुळात कारणे वेगळी आहेत. हा त्यांचा अभ्यास नाही आहे, ही लढाई असते त्याच्या रखरखत्या अस्तित्वाची व सुंदर रंगविलेल्या भविष्याची. यात आपल्यासोबत परीक्षेला बसलेले सर्व विद्यार्थी आपल्यासारखे अभ्यासू आहेत, असली त्यांची भाबडी मते..त्यांना काय माहिती यात काय-काय कांड होतात ती. सामान्यांना कोडे पडलेले असते, की या सापशिडीच्या खेळात आपलीच गोटी कशी सापावर जाते. त्यांना थोडी माहिती, की ज्या शिड्या आहेत त्याला सोन्याचा मुलामा असतो व ती सुविधा फक्त 'विशेष' असलेल्या लोकांकरिता राखीव असते.

आपल्या परीक्षा व्यवस्थेत दुधात पाणी याचे किरकोळ प्रमाण हे नेहमीच असायचे व त्याची आपल्याला सवय अंगवळणी पडलेली आहेच. आता पाण्यात दूध राहील याचीसुद्धा आपण सवय व खंबीर मानसिकता बनवायला हवीय. सामान्य लोकांना या परीक्षा व याची मंडळे दैवत वाटायची; पण यांनी हे सिद्ध केले की आम्हाला 'दैवत' वगैरे मानून घ्यायची काही गरज नाही, नुसते मनुष्य प्राणी माना, कारण दैवत म्हटले की कांड करता येणार नाही.

परीक्षा मंडळ व यातील मंडळी हीसुद्धा सामान्य लोकांच्या सारखीच असतात, उगाच लाल दिव्याच्या गाडीत ती फिरतात.. म्हणून त्यांच्यापासून फार मोठ्या अपेक्षा ठेवणे सयुक्तिक नाही. पगारात- काहींचे भागत नाही. ज्यांचे भागत नाही ते करतात काही जोड-धंदा. काहींनी इतर व्यवसाय सुरू केलेत, तर काहींनी नोकरीतच धंदा सुरू केला. उगाच आपणच त्यांच्या मागे लागून काहीही होणार नाही. फार फार तर एक आयोग, काही चौकशी, काही राजीनामे, काही निलंबन, काही बदल्या, फार झाले तर 'विशेष अधिवेशन' घेऊन त्यात चर्चा. NEET, UPSC ची कांड हा विषय.. 'विशेष अधिवेशन' या लायकीचे नसल्याने, अजून तसली कुठलीच काही चर्चा नाही. यात मायबाप सरकार काही करेल असे वाटत नाही, आता येऊ घातलेल्या विधानसभा तयारीमध्ये गुंतलेले असताना या 'अति किरकोळ' NEET, UPSC कडे कोण लक्ष घालणार.

काही वर्षांआधी परदेशात जी लोकं गैरमार्गाने- खोटी कागदपत्रे जमवून पाठवली जायची त्यांना 'कबुतर' ही संज्ञा प्रसिद्ध झालेली होती. तीच आता जणू पुनर्जीवित झाली आहे. विद्यार्थी, प्रश्नपत्रिका, परीक्षा केंद्र, या राज्यातून त्या राज्यात....दिव्यांग प्रमाणपत्रे, नॉन क्रीमी लेअर प्रमाणपत्रे, रेशनकार्ड, सर्व सर्व मॅनेज..!!! जर हे आजपर्यंत असेच चालत आलेले असेल, तर किती 'कबुतरं' उडाली आणि कुठे- कुठे जाऊन बसवली ह्यांनी!!!

ही सर्व सर्कस काही एका व्यक्तीच्या डोक्याची फलश्रुती नाही, हे नक्कीच एक ऑर्गनायझेशन असेल. यात या परीक्षा उत्तीर्ण करू देणारी ही जी मंडळी असेल हीच खऱ्या अर्थाने 'प्लेसमेंट कन्सल्टन्सी' आहेत. किती पक्का बंदोबस्त आहे यांचा! यांना जर वाव दिला तर हे उद्या या विद्यार्थ्यांना घरी बसून डॉक्टर्स पण बनवतील, दवाखाना बांधून- रुग्णसुद्धा उपलब्ध करून देतील यात कुणाला शंका नसावी. यांच्यावर आहेत UPSC च्या कन्सल्टन्सी .. क्रीमी लेयर, रेशन कार्ड, दिव्यांग प्रमाणपत्रे असली मोठी प्रकरणे हाताळतात. सामान्य जनतेला त्यांची हक्काची असलेली प्रमाणपत्रे प्रचंड हेलपाटे घेऊन मिळवावी लागतात, तसले त्रास 'विशेष' लोकांना नसावे. एखाद्या सामान्य व्यक्तीने जर यापैकी वरील एखादा प्रताप केला असेल, तर शासन त्याला चौकात गोळ्या घालायला मागे पुढे बघणार नाही.

UPSC , MPSC, NEET या केंद्र व राज्यातील स्पर्धा परीक्षा या बहुधा सर्वांसाठी कठीण नसाव्या. काही पालक अघोरी मेहनत करून आपल्या मुलांसाठी पुस्तके जमवाजमव करत असतील, काही एज्युकेशन कर्ज काढून कोचिंग लावत असतील, तर काही उच्चभ्रू पालक असले 'प्लेसमेंट कन्सल्टन्सी' शोधत असतील- म्हणजे हमखास यश प्राप्तीची गॅरेंटी. आपल्याकडे मोठ्या लोकांचे अपराध असतील, तर चौकशी आयोग व सामान्यांचे असतील तर बांबू, असली काही नियमावली असेल बहुतेक.

तर आपण ही सर्व प्रकरणे दुर्लक्षित करावी, व जे काय ते परीक्षा मंडळाचे नाव असेल, त्यांचे कार्य, व त्यांचे कांड त्याकडे लक्ष न देता फक्त आपल्या ध्येय दिशेने मार्गक्रमण करावे व फक्त याचकडे लक्ष केंद्रित करायला हवे. स्पर्धा तीव्र आहे, स्पर्धक साम-दाम-दंड-भेद घेऊन लढ्याला उभा आहे याची जाणीव असू द्या. असले उद्योग निरंतर होतील, यावर कोणाचेच नियंत्रण नाही; पण आपण लढत राहायचे, आपण खचून जायचे नाही!

## चळवळ

# एकता आणि विश्वप्रेमाचा संदेश देणारे लोककवी उत्तम मुळे




प्रा.डॉ. इसादास भडके
9096364886
erbfes@gmail,com


लोककवी उत्तम मुळे यांचा जन्म १९३६ रोजी बुलढाण्यात झाला. आठवीपर्यंत त्यांचे शिक्षण झाले. बालपणापासूनच त्यांना गीतकाव्याची अभिरूची होती. १९७२ च्या दरम्यान त्यांना गीतकार म्हणून प्रसिद्धी मिळाली. तद्वतच मान्यता मिळाली. एच.एम.व्ही. कंपनीने लोककवी उत्तम मुळे यांची गीतं 'रेकॉर्ड' केली. ही त्या काळातील महत्त्वपूर्ण घटना आहे. कृष्णा शिंदेंनी गायिलेली उत्तम मुळे यांची गीतं विदेशात पोहचली. एकता आणि विश्वप्रेमाचा संदेश सर्वत्र देणारे लोककवी उत्तम मुळे विश्वजाणिवेचे कवी ठरले. त्यांच्या काव्याला आशय आणि अभिव्यक्तीचे वेगळे वैभव प्राप्त झालेले आहे.

तथागत बुद्धांचा मानवी कल्याणाचा संदेश पोहचवणे हे लोककवी उत्तम मुळे यांच्या गीतांचे प्रयोजन आहे. त्यांची गीतं मनावर अधिराज्य करीत आलेली असून विचार करायला प्रवृत्त करणारी आहेत. 'बुद्ध गौतम का संदेश जग को सुनाये। सत्य और शांती के आदर्श हम ना भुलाए।' बुद्ध आणि बाबासाहेबांमुळे अमरत्व प्राप्त झाले. जीवनाला संदर्भ आणि अर्थ प्राप्त झाला. त्यामुळे जीवन उत्तम बनवले पाहिजे, असे उत्तम मुळे प्रतिपादित करतात. 'ईसा सुली पे चढकर अमर है, प्राण बापू गवाकर अमर है, भीम गौतम को पाकर अमर है, क्यो न हम-बुद्ध सा जीवन बनाये।' लोककवी उत्तम मुळे यांची रचना जनसामान्यांच्या हृदयाचा ठाव घेत बुद्धविचार आणि आंबेडकर विचारांची पखरण करीत वातावरण बौद्धमय करते. कवी उत्तम मुळे बुद्ध-आंबेडकरांच्या विचारांची मांडणी करतात. त्यांची एक- एक रचना विचारांना व्यापक करीत विश्वाला अभिप्रेत असणाऱ्या विचारांना प्रदीप्त करते. 'न जाती भेद है कोई न उच और उचता के भाव। जुदा हर दोष अवगुण से तथागत बुद्ध का वो गाव।' बुद्ध विचारांकडे उत्तम मुळे यांनी आकृष्ट केले आहे. नव्हे हा भावार्थ त्यांच्या गीतातून प्रतीत होतो. 'चलो उठो ए बुद्धो अब हमे गौतम बुलाते है।' 'ये बुद्ध की धरती बुद्ध न चाहे अमन परस्ती, ये बुद्ध का भारत प्रबुद्ध भारत पूर्ण समर्थक शांती का।' अशी अस्मितादर्शक प्रगल्भ जाणीव लोककवी उत्तम मुळे करून देतात. तथागतांच्या शांतीच्या मार्गाचे उत्तम मुळे वाहक असून त्यांच्या रचनेचा स्थायीभाव आहे. 'जियो, जिने दो है शांती इसी मे सत्य के दर्शन।' हा शांतीचा मार्ग सत्य असून बुद्धाकडे नेणारा आहे. 'जल्म के मारो त्रस्त जनो बुद्ध शरण मे करे धर्मांतर।' अशी धर्मांतराची आवश्यकता लोककवी उत्तम मुळे शब्दबद्ध करतात.

'युगो युगो से शापित मानव की, बदल दिया वरदानो मे। हीन दीनो के आसू तुम्ही ने बदले है मुस्कानो मे।।', 'जय भीम की गुण, गुणाता चल, भीम स्तुती मे गाता- चल।।', 'मानवता के हक दिलवाकर, जीवन का तो दान दिया। दीक्षा देकर भीम ने हमको, मुक्ती का वरदान दिया।।', 'हिंदू, मुस्लिम, बौद्ध, इसाई, सब मेरे, मै सबका भाई, नव युग के हम निर्माता, विश्व प्रेम मित्र गौरव गाथा।।' हे उत्तम मुळे यांचे काव्य मानवतेचा सर्वोच्च आविष्कार असून समताधिष्ठित मूल्ये संपूर्ण विश्वात अधिष्ठित करणारे आहे.

अष्टांग मार्ग व पंचशील ही बौद्ध धम्माची आधारशीला कवी मानतात. बहुजन हिताय, बहुजन सुखाय ही बौद्ध धम्माची फलश्रुती असून बौद्ध धम्म मुक्तीपंथ आहे याचे अधोरेखन लोककवी उत्तम मुळे करतात. उत्तम मुळे यांचा बॅरिस्टर राजाभाऊ खोबरागडे सोशल फोरम, चंद्रपूरच्या वतीने चंद्रपूरला सत्कार आयोजित करण्यात आला आणि त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. त्यांची मुलाखत या कार्यक्रमात घेण्यात आली. त्यातून उत्तम मुळे प्रांजळपणे खुले झाले. बुद्ध-भीम गीते जगात पोहचवणे हे माझ्या जीवनाचे उद्दिष्ट आहे, अशी कबुली दिली. फार हलाखीच्या परिस्थितीत आयुष्य जगत होते हे निदर्शनास आले. हा सारा प्रकार विश्वात्मक विचार मांडणाऱ्या कलावंताच्या वाट्याला यावा याची प्रचंड खंत वाटली. 'बुद्ध- आंबेडकरांचा विचार घरोघरी पोहचवितात, तसेच डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत असलेल्या बौद्ध धम्माचा प्रसार आणि प्रचार करतात. असा हा लोककवी आर्थिक प्रश्नाच्या कोंडीमुळे दारिद्र्यात खितपत पडलेला आहे. मानवी प्रेम, समाज, राष्ट्रप्रेमापोटी त्याची उदंड, बलदंड प्रभावी लेखणी संघर्षवादी झाली आहे. त्यांची गीतरचनासुद्धा खरोखरच संपूर्ण जीवनवादी विश्वाचा मार्ग सुखरूप कसा होईल याचा विचार मांडते.' असे, जे साहित्यिक महेंद्र गायकवाड म्हणतात त्याचे दर्शन उत्तम मुळे यांचे काव्य घडवते. त्यांनी बुद्धिवादी व विज्ञानवादी दृष्टीकोन परजलेला आहे.

## धुमस

### साडेसाती

असं वाटतयं निसर्ग
बळीराजाच्या जीवावर उठला
महापुराचे थैमान बघून
सैतानालाही पाझर फुटला

पेरलेल्या मोत्यांची
अक्षरशः झाली माती
जगाच्या पोशिंद्याच्या नशिबी
आली जणू साडेसाती

हातातोंडाशी आलेला
हिरावून घेतला घास
झालेली धूळधाण पाहून
गोठला काळ्या आईचा श्वास

**ॲड. अनंत खेळकर**
अकोला

## जग भ्रमंती

# ...हा आहे सगळ्यात मोठा मासा!

समुद्राच्या खोलात अद्यापही अनेक जीव असे आहेत, ज्यांच्याबद्दल मानवाला माहीत नाही. समुद्रामध्ये अनेक छोटे-मोठे जीव आढळून येतात. देवमासा (Whale) हा समुद्रातील सर्वात मोठ्या प्रजातीचा मासा ओळखला जातो. मात्र, तुम्हाला गोड्या पाण्यातील सर्वात मोठा मासा माहीत आहे का? स्टिंगरे (Stingray) म्हणजेच वाघळी मासा गोड्या पाण्यातील सर्वात मोठा मासा म्हणून ओळखला जातो. जैवशास्त्रज्ञ मागील अनेक वर्षांपासून सर्वात मोठ्या स्टिंगरेच्या शोधात आहेत. त्याचा हा शोध कंबोडियामध्ये संपला आहे.

**..या देशात सापडला महाकाय वाघळी मासाः**

कंबोडिया देशातील मेकांग नदीमध्ये आतापर्यंतचा जगातील सर्वात मोठा स्टिंगरे म्हणजे वाघळी मासा सापडला आहे. हा गोड्या पाण्यात सापडलेला आतापर्यंतचा सर्वात मोठा मासा आहे. कंबोडियातील मेकांग ही गोड्या पाण्याची नदी आहे. हा मासा मच्छीमारांच्या जाळ्यामध्ये सापडला. एवढा मोठा मासा जाळ्यात सापडल्यावर आधी मच्छीमार घाबरले होते. त्यानंतर मच्छीमारांनी परिस्थितीचा अंदाज घेत माशाला जाळ्यातून बाहेर काढले. या माशाचे वजन ३०० किलो, तर लांबी १३ फूट आढळली. या माशाबाबत माहिती मिळताच मच्छीमारांनी दक्षिण आशियामधील नद्यांच्या विविधतेच्या संरक्षणासाठी काम करणारे डॉ. होगन यांच्याशी संपर्क साधला. या नदीमध्ये एवढा मोठा स्टिंगरे सापडणे हे तर आश्चर्यकारकच होते. मासेमारांनीही आजपर्यंत एवढा मोठा वाघळी मासा पाहिलेला नव्हता.

डॉ. होगन यांनी या माशासंदर्भात माहिती देत सांगितले की, या प्रजातीचा मासा अत्यंत विषारी आणि धोकादायक मानला जातो. या माशाची शेपटी अत्यंत विषारी असते, पण हा मासा माणसांसाठी विषारी नसतो. डॉ. होगन हे दक्षिण आशियामध्ये नदीतील जैवविविधतेच्या संरक्षणासाठी काम करणाऱ्या 'वंडर्स ऑफ द मेकांग' प्रकल्पाचे सदस्य आहेत.

डॉ. होगन गेल्या १७ वर्षांपासून गोड्या पाण्यातील सर्वात मोठ्या स्टिंगरे माशाच्या शोधात आहेत. त्यांचा हा शोध कंबोडियामध्ये संपला. या मादा स्टिंगरेला इलेक्ट्रिक टॅग लावून पुन्हा त्याच्या नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले. इलेक्ट्रिक टॅगद्वारे शास्त्रज्ञांना माशाबाबत अधिक माहिती मिळण्यास मदत होते.

हा महाकाय स्टिंगरे सापडण्याआधीही एक महिन्यापूर्वी एक मोठा वाघळी मासा सापडला होता. त्याचे वजन १८१ किलो होते. शिवाय या वर्षातही आतापर्यंत दोन मोठे स्टिंगरे आढळले होते. याआधी २००५ मध्ये थायलंडमध्ये असाच विशालकाय मासा सापडला होता. मात्र, कंबोडियामध्ये सापडलेल्या माशाचे वजन त्या माशापेक्षा ६.८ किलोने जास्त आहे.

## वाचक विचार मंच

# पावसामुळे नागरिकांनी सतर्कता बाळगणे गरजेचे!

सध्या पावसाने अक्षरशः हाहाकार उडविला आहे. त्यामुळे संपूर्ण जनजीवन विसकळीत झाले आहे. नदीकाठच्या नागरिकांनी सुरक्षास्थळी आपला मुक्काम हलविला आहे, तर अनेकांनी पाहुणे-राहुळे यांची वाट धरली आहे. पावसाने मुंबईसह, पुणे, ठाणे, कोकण, पश्चिम महाराष्ट्राला झोडपून काढले आहे. त्यामुळे अनेक नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली असून अनेक मार्ग बंद झाले आहेत. परिस्थिती पाहून अनेक शाळा-कॉलेजना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. पर्यावरणाचा समतोल बिघडत असल्याने हवामानाचा अंदाज कोणालाच बांधता येईना, त्यामुळे हवामानात कधी उष्मा, तर कधी पावसाचा तडाखा, तर गारठा..आणि यांसारख्या बदलत्या वातावरणामुळे अनेक साथीचे आजार फैलावतात, याकडेही दुर्लक्ष करता येत नाही. नदीकिनाऱ्याचे लोक पुराचे पाणी पाहण्यासाठी आपल्या भागातील नद्यांकडे जात असतात. मात्र, काही हुल्लडबाजांना असल्या प्रकारामुळे आपला प्राण गमवावा लागतो त्यासाठी प्रत्येकानी आपल्या भागातील आलेला पूर म्हणजे पर्यटन क्षेत्र नव्हे, हे लक्षात घ्यायला हवे!

**राजू जाधव**, मांगूर, जि. बेळगांव

### एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व कालवश!




९३व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष आणि हरित वसई चळवळीचे प्रणेते व सामाजिक कार्यकर्ते फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांचे झालेले निधन म्हणजे सामाजिक, साहित्यिक, पर्यावरण, धार्मिक क्षेत्रातील व्यक्तिमत्त्वाचा अस्त होय.

साहित्य, पर्यावरण आणि समाजकारण या क्षेत्रांत एकाचवेळी कार्यरत राहून भरीव योगदान देणारे, धर्मगुरू अशी फ्रान्सिस दिब्रिटो यांची ओळख होती. त्यांच्या निधनामुळे या सर्वच क्षेत्रांत शोककळा पसरली आहे. त्यांच्या आत्म्याला भावपूर्ण श्रद्धांजली.

**धोंडीरामसिंह ध. राजपूत**, वैजापूर,
जि. छत्रपती संभाजीनगर, मो. नं.: ९४२१३१२२४४

## गुल्लेर

# लबाडाचं आवतन




नरेंद्र इंगळे
9561226572


'अरे नथुबुढा आपटला..'

'काय पाहून राह्यले? उचला बुढ्याले.'

'काही लागलं काय?'

'लागलं नाही.. भरला बुढा गाऱ्यानं.'

'एकही रस्ता धड नाही सायचा आपल्या गावात.. कोन्याही रस्त्यानं जा.. गाटा आहेच.'

'काल कुकाबुढी गुंड घेऊन आपटली इरीपाशी.'

'अरे लय लोकं आपटले. बारक्या गाडीऊन आपटला.. शाळेचे लेकरं रोजच पडतात..'

'ते सरपंचीन बाईचे हजबंड आले.. त्याहिले विचारा.'

'काहो अजाबराव.. सरपंचीन बाई कुठी गेल्या?'

'ते लेकरं घेऊन आकोल्यात राह्यते. लेकरं शाळेत टाकले.'

'सरपंचीन मस्त फोमच्या गादीवर बसते अन् इकडे दनादन लोकं गाऱ्यात आपटून राह्यले.'

'मी तिचा हजबंड जिता आहो ना.. मले सांगा.'

'हे गावातले रस्ते कधी दुरुस्त करता ते सांगा. तिकडे शिवाजी महाराजच्या पुतळ्यापाशी गटार झालं. बाबासाहेबाच्या पुतळ्यापाशी पाय फसतात. कुठी ध्यान आहे तुमचं?'

'ते कायले फिरतीन? आजच खोप्याच्या बाहीर निंगाले.'

'सांगा.. कधी होते रोड?'

'कालच मी जिल्हा अध्यक्षासोबत बोललो. ते म्हनत मी एकनाथभाऊले फोन करतो.'

'एकनाथभाऊ टॅक्टर पाठोतीन काय आपल्या गावात?'

'आता इलेक्शन नाही काय? सगळं मुख्यमंत्र्याच्या हातीच असते. ते म्हनत मी ताबडतोब सर्व्हे कराले मानसं पाठवतो.'

'सर्व्हे कायले करा लागते? डायरेक गिट्टी अन् रेतीचे ट्रक पाठवा म्हना..डाबरीत मुरुम टाका.'

'सगळंच होते.. सगळे रस्ते सिमेंटचे होतात. पुतळ्यापाशी गट्टू टाकून देऊ.. तुमचे घराच्या पायरीपाशी गट्टू.. पायाले माती लागनार नाही.'

'अन् वावराच्या रस्त्याचं काय करता? टोंगायइतके पाय फसतात.'

'त्याचाही बंदोबस्त करु.. एकएक सगळं होईन..'

'पन हे सगळं कधी होईन? पुढच्या मयन्यात आचारसंहिता लागते म्हनतात.'

'घरी गेल्याबरोबर एकनाथभाऊले फोन लावतो..तिसऱ्या दिवशी काम सुरू होईन.'

'लबाडाचं आवतन जेवल्यावर खरं..'

'काय म्हटलं?'

'काही नाही!'



## कांदा-टोमॅटोनंतर आता बटाटा तेजीत
## शेतकरीविरोधी निर्णय...

# केंद्र सरकार बटाटा करणार आयात?

वृत्तसंस्था

**नवी दिल्ली :** देशभरात गेल्या काही दिवसांपासून भाजी पाल्यांचे दर वाढताना दिसले. टोमॅटो, हिरवी मिरची आणि पालेभाज्या यांसारख्या भाज्याचे दर गगनाला भिडल्याचे दिसून आलं. बदलत्या हवामानाचा पीकांवर गंभीर परिणाम झालाय.

सध्या पालेभाज्यांचे दर काही प्रमाणात उतरले आहेत. मात्र, कांदा-टोमॅटोचे दर अजूनही वरचढच आहेत. मुंबई, दिल्ली तसेच कोलकाता यांसारख्या शहरात टोमॅटो १०० रुपये किलोच्या भावाने विकले जात आहेत. राज्यातही बऱ्याच भागात टोमॅटोचे दर कडाडले आहेत. अशात बटाट्याचे दर देखील वाढतच चालले आहेत.

यामुळे केंद्र सरकारने देखील हालचाली वाढवल्या आहेत. सरकार सध्या व्यापाऱ्यांना कमी प्रमाणात बटाटे आयात करण्याची परवानगी देऊ शकते. भूतानमधून बटाटे खरेदी करण्यास सरकारने गेल्या वर्षी मान्यता दिली होती. जून २०२४ पर्यंत परवान्याशिवाय व्यापारी भारतात बटाटे आणू शकत होते. गेल्या वर्षी भारतात ६०.१४ दशलक्ष टन बटाट्याचे उत्पादन झाले होते. यंदा बटाट्याचे उत्पादन कमी होण्याची शक्यता आहे.

### प्रमुख बटाटा उत्पादक राज्यांमध्ये बटाटा पिकावर परिणाम

खराब हवामानामुळे पश्चिम बंगाल आणि उत्तर प्रदेश या प्रमुख उत्पादक राज्यांमध्ये बटाटा पिकावर परिणाम झाला आहे. यामुळे कांदा, टोमॅटोप्रमाणे बटाट्याचे भावही वाढू लागले आहेत. टोमॅटो, कांदा आणि बटाट्याची महागाई ४८.४ टक्क्यांवर पोहोचली आहे. बटाट्याचे दर असेच वाढत राहिले तर, ऑक्टोबरपासून बाजारात तुटवडा निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. दरवर्षी नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये बाजारात बटाट्याचा तुटवडा भासत असतो. मात्र, यावेळी आतापासूनच तुटवडा जाणवू लागला आहे.

# प्रवास २० टक्के महागला

### १६ विमानतळांनी विकास शुल्कात २२४ टक्के केली वाढ

**नवी दिल्ली:** देशातील हवाई प्रवास आणखी महाग होऊ शकतो. याचे कारण म्हणजे बंगळुरू, कोची आणि अहमदाबादसह १६ प्रमुख विमानतळांवर वापरकर्ता विकास शुल्क २ टक्क्यावरून २२३ टक्क्यापर्यंत वाढले आहे. पाटणा विमानतळावरील हे शुल्क २०४ रुपयांवरून ६६० रुपये झाले आहे. त्यामुळे विमान भाडे ४५६ रुपयांनी वाढू शकते. इंडियन टुरिझम असोसिएशनच्या अध्यक्षा ज्योती मायाल यांच्या मते, विमानतळाच्या ऑपरेशन आणि देखभालीसाठी उच्च विकास शुल्क योग्य आहे. मात्र, त्याचा बोजा प्रवाशांवर पडतो. हवाई वाहतूक तज्ज्ञ गौरांग शाह म्हणतात की नवीन विमानतळांच्या बांधकामामुळे आणि टियर २-३ शहरांमध्ये कनेक्टिव्हिटी आणि फ्लाइट्स वाढल्यामुळे मागणी झपाट्याने वाढली आहे.



**सुविधा वाढल्याने भाडे वाढले**
उड्डाणे नसल्यामुळे ही मागणी पूर्ण करण्यासाठी उद्योग धडपडत आहेत. सुविधांमध्ये वाढ झाल्यामुळे विमानतळ प्राधिकरण विकास शुल्कात वाढ करत आहे. त्यामुळे विमान भाड्यात आणखी वाढ होण्याची शक्यता आहे.

# पाकिस्तानचे मनसुबे कधीच पूर्ण होऊ देणार नाही!

### कारगिल विजय दिनानिमित्त पंतप्रधानांचा दहशतवाद्यांना इशारा!

वृत्तसंस्था

**कारगिल :** कारगिल विजय दिनानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज देशवासियांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी पाकिस्तानवर सडकून टीका केली. पाकिस्तानचे मनसुबे कधीच पूर्ण होऊ देणार नाही, अशी ग्वाही देताना त्यांनी पाकिस्तानातील दहशतवाद्यांनाही इशारा दिला आहे. ते कारगिल येथूनच बोलत होते.

'कारगिल विजय दिवस आम्हाला सांगतो की राष्ट्रासाठी दिलेलं बलिदान अमर होतात. दिवस, महिने, वर्षे ,शतके जातात, परिस्थिती बदलते पण राष्ट्राच्या सुरक्षेसाठी आपल्या जीवाची बाजी लावणाऱ्यांची नावे कायम अमर राहतात. हा देश आमच्या लष्कराच्या पराक्रमी महानायकांचा सदा सर्वदा ऋणी आहे. हा देश त्यांच्याप्रती कृतज्ञ आहे. माझं सौभाग्य आहे की कारगिल युद्धाच्या वेळी मी



देशाचा सामान्य नागरिक म्हणून आपल्या सैनिकांच्या मध्ये होतो', असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

'मला आठवतेय कशा पद्धतीने आमच्या लष्कराने एवढ्या उंचीवर, एवढे कठीण युद्ध ऑपरेशन लढले होते. मी देशाला विजयी करणाऱ्या अशा सर्व शूरवीरांना आदरपूर्वक प्रणाम करतो. मी शहिदांना नमन करतो की ज्यांनी कारगिलमध्ये मातृभूमीच्या रक्षणासाठी आपले सर्वोच्च बलिदान दिले.

# 'त्या' विमानाचा 'ब्लॅक बॉक्स' सापडला

### अपघाताचे खरे कारण समोर येणार

**काठमांडू :** काठमांडूच्या त्रिभुवन आंतरराष्ट्रीय विमानतळावर २५ जुलैला सौर्य एअरलाइन्सच्या विमान कोसळून मोठा अपघात झाला. यामध्ये १८ जणांचा मृत्यू झाला असून विमानाचे पायलट बचावले आहेत. आता या क्रॅश झालेल्या विमानाचा ब्लॅक बॉक्स नेपाळच्या अधिकाऱ्यांनी मिळवला आहे. या दुर्घटनेच्या तपासासाठी तपास पथकाची स्थापना करण्यात आली आहे. या भीषण अपघातात एका लहान मुलासह १८ जणांचा मृत्यू झाला होता.




क्रॅश झालेल्या विमानाचा ब्लॅक बॉक्स जप्त करण्यात आला असून तो आवश्यक कारवाईसाठी तपास पथकाकडे सोपवण्यात आला आहे, अशी माहिती नागरी उड्डाण प्राधिकरणाचे उपमहासंचालक हंस राज पांडे यांनी दिली. तपास पथकाचे नेतृत्व नागरी विमान वाहतूक प्राधिकरणाचे माजी महासंचालक रतीश चंद्रलाल करत आहेत, तसेच यात इतर चार तज्ज्ञांचाही समावेश आहे.

# 44 लाख शेतकऱ्यांना पाच वर्षे मिळणार मोफत वीज?

**मुंबई:** राज्यातील शेतकऱ्यांबाबत नेहमीच नवनवीन योजना सरकारकडून आणल्या जातात. यामुळे शेतकऱ्यांना देखील याचा खूप जास्त फायदा होतो. अशातच आता राज्यातील ७.५ अश्वशक्तीपर्यंतच्या कृषी वीज ग्राहक शेतकऱ्यांना पुढील ५ वर्ष मोफत वीज देण्याचा शासन जीआर देखील काढण्यात आलेला आहे. हा जीआर २५ जुलै २०२४ रोजी गुरुवारी काढण्यात आलेला आहे. एप्रिल २०२४ ते २०१९ मार्च यादरम्यान ही योजना लागू राहणार आहे.

४४ लाख ३ हजार शेतकऱ्यांना या योजनेचा फायदा होणार आहे. ही योजना आता चालू

**सरकारने काढला जीआर**



झाल्यानंतर पुढील तीन वर्षे चालू राहणार आहे. तिचा आढावा घेतल्यानंतरच पुढील कालावधीत ही योजना राबवण्याचा निर्णय सरकारकडून घेण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना कृषी पंपाची वीज मोफत मिळावी, यासाठी मुख्यमंत्री आणि वित्तमंत्री अजित पवार यांनी विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात अर्थसंकल्प सादर करताना ही घोषणा केलेली आहे. कृषी पंपाच्या बिलाच्या वसुलीची चिंता महावितरणला नेहमीच असते. त्यामुळे आता या वीज बिलाचे १४ हजार ७६० कोटी रुपये हे सरकार आता महावितरणला देणार आहे. त्यामुळे महावितरणला कोणत्याही प्रकारची चिंता राहणार नाही. कृषी पंप विजबिलाची एकूण थकबाकी ही ५०००० कोटी रुपये एवढी आहे. या योजनेअंतर्गत राज्य सरकार महावितरणाला दरवर्षी १४,७६० कोटी रुपयांचे अनुदान देणार आहे.

# राहुल गांधींच्या घराचा पत्ता बदलला

### प्रियंका गांधींनी केली भावाच्या नवीन घराची पाहणी

वृत्तसंस्था

**नवी दिल्ली:** काँग्रेस खासदार आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या घराचा पत्ता बदलणार आहेत. त्यांना लवकरच राजधानी दिल्लीत नवा बंगला दिला जाणार आहे. दरम्यान, शुक्रवारी (दि.२६) काँग्रेस महासचिव आणि राहुल यांची बहीण प्रियंका गांधी यांनी आपल्या भावाच्या नवीन बंगल्याची पाहणी केली.

मिळालेल्या माहितीनुसार, राहुल यांना सुनेरी बागेत बंगला क्रमांक ५ देण्यात आला आहे. यापूर्वी राहुल गांधी यांचे अधिकृत निवासस्थान १२ तुघलक लेन, नवी



दिल्ली होते. लोकसभा सदस्यत्व गमावल्याने बंगला सोडावा लागला.

गेल्या वर्षी मोदी अडनाव प्रकरणात राहुल गांधी यांचे लोकसभा सदस्यत्व रद्द करण्यात आले होते, त्यामुळे त्यांना आपल्या १२ तुघलक लेन येथील बंगला रिकामा करावा लागला होता. मात्र, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर त्यांचे सदस्यत्व पुन्हा बहाल करण्यात आले. सदस्यत्व बहाल केल्यानंतर त्यांना पुन्हा बंगला परत देण्यात आला. मात्र, त्यांनी तो बंगला घेण्यास नकार देत, आई सोनिया गंधा यांच्यासोबत राहण्याचा निर्णय घेतला.


**प्रियंका गांधी वायनाडमधून निवडणूक लढवणार:** वायनाड: सध्या राहुल गांधी १० जनपथ येथील बंगल्यात राहत आहेत. यंदाच्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी वायनाड आणि रायबरेली, या दोन लोकसभा जागांवरुन निवडणूक लढवली होती. दोन्ही जागांवर ते विजयी झाले. मात्र, त्यांनी वायनाडची जागा आपल्या बहिणीसाठी सोडली. आता वायनाडमधून प्रियंका गांधी पोटनिवडणूक लढवणार आहेत.



**इगतपुरी :** नाशिक शहरापासून ४० किलोमीटर अंतरावर असलेले इगतपुरी शहर निसर्गरम्य पर्यटनासाठी ओळखले जाते. पावसाळ्यात वाहणारे धबधबे, हिरवेगार डोंगर आणि धूके पाहण्यासाठी पर्यटक मुंबईतून इगतपुरीला येत असतात.

# एअर फ्रायर; पार्सल उघडताच महिलेला धक्काच बसला!

**कोलंबिया :** ऑनलाइन शॉपिंगमुळे अनेकांचे आयुष्य सोपे झाले आहे. घरबसल्या वस्तु मिळत असल्याने अनेकजण आज ऑनलाइन शॉपिंगला प्राधान्य देत आहेत. मात्र, आज या सोयीच्या वाटणाऱ्या गोष्टीमुळे त्याचे तोटे देखील पुढे आले आहेत. मागवली एक गोष्ट व मिळाली दुसरी अशा अनेक घटना उघडकीस आल्या आहेत. अशीच एक घटना नुकतीच उघड झाली आहे. ज्याने एका महिलेचा थरकाप उडाला. खरेतर, कोलंबियातील एका महिलेने नुकतेच अमेझॉनवरून एअर फ्रायर मागवले होते. पण जेव्हा तिने पॅकेज उघडले तेव्हा तिला एअर



फ्रायरऐवजी बॉक्समधून जिवंत सरडा बाहेर पडला. बॉक्समधून सरड्याने महिलेच्या अंगावर उडली मारल्याने तिचा थरकाप उडाला. ती घाबरून किंचाळली. ही बाब तिने सोशल मिडियावर पोस्ट केली असून ती व्हायरल झाली आहे. यावर नेटकऱ्यांनी अनेक प्रतिक्रिया दिल्या आहेत. एका रिपोर्टनुसार, सोफिया सेरानो नावाच्या महिलेने तिच्या घरासाठी ॲमेझॉनवरून एअर फ्रायर ऑर्डर केले होते.

# 'इथे फक्त उच्च दर्जाचेच अधिकारी करू शकतात लघवी'

**बांग्लादेश :** सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर व्हायरल होत असलेल्या फोटोमध्ये ५ युरिनल दिसत असून त्यातील पहिल्या दोन वर ते फक्त उच्च अधिकाऱ्यांसाठी राखीव असल्याचे लिहिले आहे. या फोटोवरून नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

जर तुम्हाला अचानक लघवी करण्याची तीव्र इच्छा झाली असेल, आणि तुम्ही तुमच्या जवळच्या सार्वजनिक स्वच्छतागृहात जाल. मात्र, तुम्ही तेथे गेल्यावर तुम्हाला ते

### टॉयलेटमधील पाटी पाहून संतापले नागरिक

स्वच्छतागृह केवळ उच्च अधिकाऱ्यांसाठी राखीव असल्याचे समजल्यावर तुमचे डोके नक्कीच फिरणार. तुम्ही म्हणाल टॉयलेटमधील युरीनल कोण कशाला राखीव ठेवेल? पण, हे झाले आहे. सध्या सोशल मिडियावर या बाबतची एक पोस्ट व्हायरल होत असून या पोस्टने खबळल उडाली आहे.

# भाजप नेत्याच्या मुलाची गुंडगिरी..

### वृद्ध व्यक्तीला घरात घुसून मारहाण

बिजनौर : उत्तर प्रदेशमधील बिजनौर येथील भाजप नेत्याच्या डॉक्टर मुलाचा गुंडगिरीचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे, ज्यात तो एका वृद्ध व्यक्तीला मारहाण करत असल्याचे दिसत आहे. मुलाचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर बिजनौर सदरच्या अध्यक्ष आणि भाजप नेत्या इंदिरा सिंह यांच्याकडेही बोट दाखवण्यात आले. या व्हिडिओवर नेटकऱ्यांच्या संतापजनक प्रतिक्रिया येत आहेत.

# देशभरात साजरा झाला कारगिल विजय दिवस

वृत्तसंस्था

**नवी दिल्ली :** २६ जुलै हा दिवस दरवर्षी संपूर्ण भारतामध्ये कारगिल दिवस म्हणून साजरा केला जातो. हा दिवस भारताच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे. या दिवशी १९९९ च्या कारगिल युद्धात अनेक जवानांनी त्यांच्या प्राणांची आहुती दिली. त्याच देशासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या जवानांच्या शौर्याला श्रद्धांजली वाहण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो.

कारगिल विजय दिवसाचा

मे १९९९ मध्ये भारताला घुसखोरीची जाणीव झाल्यावर भारतीय लष्कराला 'ऑपरेशन विजय' सुरू करावे लागले आणि कारगिल युद्ध झाले. काश्मीरमधील कारगिल जिल्ह्यात आणि नियंत्रण रेषेवर भारत आणि पाकिस्तान यांच्यात मे ते जुलै १९९९ पर्यंत हा संघर्ष चालला. भारतीय लष्कराने पाकिस्तानी घुसखोरांना हुसकावून लावले आणि टायगर हिल आणि इतर सामरिक स्थानांवर यशस्वीपणे कब्जा केला.

### कारगिल विजय दिवसाचे महत्त्व

पाकिस्तानी सैन्य आणि दहशतवाद्यांनी, एका नापाक हालचालीत, उत्तर कारगिलमधील नियंत्रण रेषेच्या (एलओसी) भारतीय बाजूमध्ये घुसखोरी केली. काश्मीर आणि लडाखमधील दुवा तोडण्यासाठी, तसेच अशांतता निर्माण करण्यासाठी उंच टेकडीवर कब्जा केला. कारगिल विजय दिवस दरवर्षी २६ जुलै रोजी भारताच्या युद्धातील विजय, भारतीय सैनिकांचे शौर्य आणि बलिदान यांचा सन्मान करण्यासाठी साजरा केला जातो.

इतिहास १९७१ च्या सुरुवातीस भारत आणि पाकिस्तान यांच्यातील युद्धाशी जोडलेला आहे, ज्यामुळे 'बांग्लादेश' नावाचा स्वतंत्र देश म्हणून पूर्व पाकिस्तानची निर्मिती झाली. यानंतरही, दोन्ही देश एकमेकांशी

### विजय दिवस



भिडत राहिले, ज्यात आजूबाजूच्या डोंगराळ भागांवर लष्करी चौक्या तैनात करून सियाचीन ग्लेशियरवर वर्चस्व मिळविण्याच्या लढाईचा समावेश आहे.

# कारागृहातून सुटलेल्या गुन्हेगाराची भरवस्तीत जंगी मिरवणूक

**नाशिक :** गंभीर गुन्हे दाखल असलेल्या व नाशिक रोड कारागृहात स्थानबद्ध असलेल्या सराईत गुन्हेगाराची कारागृहातून सुटका झाली. त्यावेळी त्याच्या समर्थकांनी बेथेल नगर ते आंबेडकर चौक, साधु वासवानी रोड, शरणपूर रोडवर कार व दुचाकी वाहनांच्या गर्दीत पायी वरात काढली. या जमावात सराईत गुन्हेगारांसह हद्दपारी झालेल्या गुंडांचाही सहभाग आढळून आला. त्यामुळे सरकारवाडा पोलिस ठाण्यात कारागृहातून सुटका झालेल्या गुन्हेगारासह इतर सात जणांविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

कारागृहातून बाहेर पडलेल्या सराईत गुन्हेगाराची साथीदारांनी शरणपूर रस्ता भागात आलिशान मोटारीतून मिरवणूक काढली. यावेळी अर्वाच्च घोषणाबाजी, वाहनांचे कर्कश भोंगे वाजवत दहशतीचे वातावरण निर्माण करण्यात आले. यातील हर्षद पाटणकर हा सराईत गुन्हेगार आहे. त्याच्यावर शहर पोलिसांनी एमपीडीए अंतर्गत कारवाई केली होती. वर्षभर तो कारागृहात होता. हर्षद सुनील पाटणकर याच्याविरोधात अनेक गंभीर गुन्हे दाखल असल्याने तत्कालीन पोलीस आयुक्त अंकुश शिंदे यांनी हर्षदला जुलै २०२३ मध्ये एमपीडीए कायद्यानुसार नाशिक रोड कारागृहात वर्षभरासाठी स्थानबद्ध केले होते.

# दिग्दर्शक फराह खानला मातृशोक

### मेनका इराणी यांचे निधन

वृत्तसंस्था...

**मुंबई :** प्रसिद्ध कोरिओग्राफर फराह खान ही अनेक कारणाने चर्चेत असते. मात्र आता फराह खानवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. फराह खानच्या आईचे निधन झाले आहे. यामुळे बॉलिवूडमध्ये शोककळा पसरली आहे. फराह खानची आई मेनका इराणी यांचे वयाच्या ७९ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले आहे. मेनका इराणी यांनी शुक्रवारी अखेरचा श्वास घेतला. काही



काळापासून त्या आजारी होत्या.

फराह खान आणि दिग्दर्शक साजिद खान यांची आई मेनका खान यांचे निधन झाले आहे. मेनका इराणी दिर्घकाळ आजारी होत्या. त्यांना अनेकदा रूग्णालयात दाखल करण्यात आले होते.

# दोन्ही पायावर कोरली होती शत्रूंची नाव

वृत्तसंस्था

**वरळी :** वरळीत 'सॉफ्ट टच स्पा' मध्ये हत्या करण्यात आलेल्या पोलीस खबरी गुरूसिद्धप्पा वाघमारे याने आपल्या जीवनात अनेक शत्रू पाळून ठेवले होते, हे शत्रू कुठल्याही क्षणी आपला घात करतील म्हणून गुरूसिद्धप्पाने आपल्या दोन्ही पायांच्या मांडीवर २२ शत्रूच्या नावांची यादी टॅटू रुपात कोरून ठेवली होती.

या यादीत अटक करण्यात आलेला 'स्वाफ्ट टच स्पा'चा मालक संतोष शेरेगर याचेदेखील नाव कोरले होते. दरम्यान पोलिसांना गुरूच्या घरी तपासणी केली असता

### वरळी स्पामध्ये मारल्या गेला गुरू वाघमारे



त्यात एक लाल रंगाची डायरी मिळून आली. त्यात विविध स्पा मालकाकडून वसूल केलेल्या हप्त्याचा लेखाजोखा मांडला होता. वरळी पोलिसांनी या हत्येप्रकरणी संतोष शेरेगर याला अटक केली असून गुन्हे शाखेने नालासोपारा आणि राजस्थान मधील कोटा येथून तिघांना ताब्यात घेतले आहे.

# कचऱ्याच्या व्यवस्थापनावरून सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली महापालिकेला सुनावले

### कार्यपद्धतीवर ओढले ताशेरे

**नवी दिल्ली:** दिल्लीतील कचऱ्याच्या व्यवस्थापनावरून सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली महापालिकेला (एससीडी) सुनावले आहे. राजधानी दिल्लीत कचऱ्याची समस्या अतिशय गंभीर असून येथील परिस्थिती अतिशय दयनीय आहे, असे ते म्हणाले. तसेच अशा परिस्थितीमुळे सार्वजनिक आरोग्याच्या समस्या निर्माण होऊ शकतात, अशी टिप्पणीही सर्वोच्च न्यायालयाने केली.

एका वृत्तानुसार, दिल्लीत कचऱ्याचे व्यवस्थापन नीट होत नसल्याचा दावा करत जनहित याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेवर आज न्यायमूर्ती एएस ओका आणि न्यायमूर्ती एजी मसीह यांच्या खंडपीठासमोर सुनावणी पार पडली. यावेळी न्यायालयाने दिल्ली महापालिकेच्या कार्यपद्धतीवर चांगलेच ताशेरे ओढले. दिल्लीत दररोज ११ हजार टन कचरा निर्माण होतो. मात्र, केवळ ८ हजार टन कचऱ्यावरच प्रक्रिया केली जाते. उर्वरित ३ हजार टन कचरा तसाच पडून राहतो. ही अतिशय गंभीर बाब आहे.

# तलावडा फाटा ते रेवकी देवकी, गोंदी रस्त्याची अत्यंत दुरावस्था!

नागरिकांचे होताहेत अक्षरशः बेहाल • एक वर्षांपासून बस सेवा बंद • नागरिकांतून रस्ता करण्याची मागणी • गप्पा मारणारे लोकप्रतिनीधी कुठं गेले

गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

तालुक्यातील तलावडा फाटा ते रेवकी देवकी. संगमजळगाव. गोंदी रस्त्याची पावसाळ्यात दुरवस्था झाली आहे. १० किलोमीट अंतराचा रस्ता हा जीवघेणा बनला असून पावसामुळे रस्त्यावर चिखल होऊन दयनीय अवस्था झाली आहे. सध्या पावसाळा सुरू असल्याने रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य असून नागरिकांना अक्षरशः गाळातून मार्गक्रमण करावे लागत आहे. मागील अनेक वर्षांपासून डांबरापासून वंचित असलेल्या या प्रमुख रस्त्याकडे कार्यसम्राट आमदार लक्ष्मण पवार यांनी ताबडतोब लक्ष देऊन डांबरीकरण करणे अपेक्षित आहे. रेवकी व गोंदी या दोन्ही गावांना जोडणारा प्रमुख रस्ता आहे. त्यामुळे नागरिकांना मोठ्या कसरतीने या रस्त्यावरून प्रवास करावा लागत आहे. सध्या पावसाळा सुरू असल्याने हा दहा किलोमीटर अंतराचा रस्ता चिखलमय होऊन रस्त्यात खड्डेच खड्डे पडले असून वाहने चालवणे जिकिरीचे बनले आहे. तसेच नागरिकांना चिखलातून पायी चालणे देखील मुश्किल झाले आहे. दळणवळणासाठी हा प्रमुख रस्ता असल्यामुळे येथील



नागरिकांची नियमित या रस्त्यावर वर्दळ असते, तहसील कामासाठी, बँकेच्या कामासाठी, शेतात जाण्यासाठी तसेच इत्यादी महत्वपूर्ण कामासाठी रेवकी देवकी. संगम जळगाव. हिंगणगाव गोंदी येथील नागरिकांना या रस्त्यावरून ये-जा करावी लागते. पावसामुळे

पान २ वर...

### ...अन्यथा सर्वस्वी जबाबदारी

या रस्त्याच्या दुरावस्थेसाठी तहसील प्रशासन पोलीस प्रशासन ही जबाबदार आहे अवैध वाळू उपसा होत असल्याने या रस्त्याची अतिशय दयनीय अवस्था झाली आहे तरी या रस्त्याचे काम ताबडतोब गरजेचे आहे नसता या भागातील सर्व नागरिक लोकशाही मार्गाने आंदोलन करतील व या आंदोलनाची सर्वस्वी जबाबदारी शासनाची राहील असे मत सुरेश सौंदलकर, आबासाहेब चोरमले, भाऊसाहेब नरोटे, महादेव बाबरे, सतीश चोरमले, कृष्णा सौंदलकर, राहुल बनगर, बंडू चोरमले, प्रलाद चोरमले, भैयासाहेब चोरमले यांच्यासह गावातील नागरिकांनी नोंदवले आहे

# काँग्रेस निवडीने जबाबदारी वाढली!

अभिनंदनिय : शहर जिल्हाध्यक्षपदी इंजि.सुजित क्षेत्रे



नगर/पुण्यभूमी प्रतिनिधी

नगर शहरात काँग्रेस पक्षाच्या नुकत्याच पार पडलेल्यामहासंकल्प मेळावा- लक्ष विधानसभेचे या मध्ये राज्याचे माजी महसूलमंत्री ज्येष्ठ काँग्रेस नेते आ बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते व खा निलेश लंके व शहर जिल्हाध्यक्ष किरण काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या मेळाव्यात युवा नेते इंजि सुजित क्षेत्रे यांना नियुक्ती चे पत्र देण्यात आले.सुजित क्षेत्रे हे इंजिनियर असून व्यवसायिक आहेत. मागील दोन वर्षांपासून त्यांच्यावर काँग्रेसच्या आयटी विभागाची जबाबदारी होती. आता त्यांना बढती देण्यात आली आहे त्यांचा शहरात दांडगा जनसंपर्क आहे इंजि सुजित क्षेत्रे बुद्धवासी वेतन निरीक्षक सुरेश क्षेत्रे यांचे चिरंजीव आहेत.

शहरातील अनेक कार्यकर्ते व पदाधिकारी यांनी आ बाळासाहेब थोरात यांच्या प्रमुख उपस्थितीत काँग्रेस पक्षात प्रवेश केला राष्ट्रवादी काँग्रेसचे मागासवर्गीय विभागाचे माजी अध्यक्ष अरुण घोरपडे यांनी ही राष्ट्रवादी काँग्रेसला सोडचिठ्ठी देत काँग्रेस मध्ये प्रवेश केला.यावेळी


पान २ वर...

# राष्ट्रसंत भगवान बाबांच्या जयतीनिमित्त व्याख्यान

बंधुभाव : परळी तालुका,शहर पत्रकार संघाचा उपक्रम

परळी/ पुण्यभूमी प्रतिनिधी

राष्ट्रसंत भगवान बाबा महाराज यांच्या १२८ व्या जयंतीनिमित्त परळी तालुका व शहर पत्रकार संघाच्या वतीने राष्ट्रसंत भगवान बाबा महाराज यांचे सामाजिक शैक्षणिक आणि आजचे वास्तव या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास पत्रकार बांधवांनी उपस्थित राहावे असे आवाहन आयोजक ज्येष्ठ संपादक, साहित्यिक रानबा गायकवाड, इंजि. भगवान साकसमुद्रे, संपादक बालासाहेब फड, सम्राट गित्ते आदींनी केले आहे.



राष्ट्रसंत भगवान बाबा महाराज यांच्या जयंतीनिमित्त लोकनेते गोपीनाथराव मुंडे पत्रकार भवन येथे सेवानिवृत्त शिक्षक तथा लेखक ए.तू.कराड सर यांचे राष्ट्रसंत भगवान बाबा महाराज यांचे सामाजिक शैक्षणिक विचार आणि आजचे वास्तव या विषयावर व्याख्यानाचे आयोजन २९ जुलै २०२४ रोजी सकाळी ११ वाजता करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून परळी शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय लोहकरे तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दैनिक अतुल्य महाराष्ट्राचे मुख्य संपादक नितीन ढाकणे यांचे उपस्थिती लाभणार आहे. तर प्रमुख पाहुणे

पान २ वर...

# केज पोलिसांना अवैध धंद्यांना आवर घालता येईना

प्रश्नचिन्ह : केजला दोन पोलीस ठाणे असतानाही समस्या

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यामध्ये दोन पोलीस स्टेशन असताना देखील या दोन्ही पोलीस ठाण्याच्या अधिकारी कर्मचाऱ्यांना आपल्या हद्दीत चालत असलेल्या अवैध धंद्यांना आवर घालता येईना. याला कोणाची संमती आहे? की जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाते. असा प्रश्न ग्रामीण भागातील नागरिकांना पडला असून आमची पोरं बाळ मात्र उध्वस्त आयुष्याच्या दिशेने वाटचाल करीत आहेत. याला पोलीस यंत्रणाच जबाबदार असल्याचा स्पष्ट आरोप केला जाऊ लागला आहे.केज हे तालुक्याचे शहर वगळता या तालुक्यात सर्व गावात ग्रामपंचायत आहेत. यावरून लोकसंख्या देखील त्या त्या गावची त्या त्या प्रमाणात आहे. केज तालुक्यातील केज आणि युसूफ वडगाव या दोन पोलीस स्टेशनच्या हदीत ग्रामीण भाग येतो. सहाजिकच दोन्हीही पोलीस स्टेशनच्या अधिकारी आणि बीट अंमलदारांना कोणत्या



गावात काय चालतं? याची मुखपाठ माहिती असते. परंतु या दोन्हीही पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये अवैध धंधाने एवढा जोर धरला आहे की, याच्याकडे वरिष्ठ अधिकारी का लक्ष देत नाहीत, असा प्रश्न ग्रामीण भागातील लोकांना पडला आहे. केजला डिवाएसपी म्हणून पंकज कुमावत होते तेव्हा युसुफ वडगाव पोलीस ठाण्याच्या अधिकारी कर्मचाऱ्यांना शासकीय कामाव्यतिरिक्त कुठेही मतलबासाठी लक्ष देता येत नव्हतं. परंतु आज एवढी भयानक परिस्थिती झाली आहे की, कोणी कोणाला मोजायला तयार नाही असे दिसून येऊ लागले असल्याचे ग्रामीण लोक सांगत आहेत.युसुफवडगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत गावोगावी मटका, अवैध गुटखा विक्री, अवैध दारू विक्री जोमात चालत असून कित्येक धाबे अवैध दारू विक्री वरच चालतात हे स्पष्ट चित्र आहे. या संदर्भात दोन्हीही पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांना काही देणं घेणं नाही असं दिसून येत असल्याचे ग्रामस्थ सांगतात. नव्हे तर या दोन्हीही पोलीस ठाण्याचे संबंधित वसूली पोलीस महिन्याकाठी हप्ता वसुलीसाठी कुठेतरी हॉटेल चहा पीत गप्पा मारत बसलेले दिसून येतात. जणू या पोलिसांच्या संमतीने या पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंदे बोकाळले असल्याचा आरोप देखील केला जात आहे. त्यामुळे याचा फटका ग्रामीण भागातील शेतकरी,

पान २ वर...

# दयानंद सोनवणे यांचे निधन

कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी



आष्टी तालुक्यातील वेलतुरी येथिल मुळ रहिवासी असलेले व कडा येथे वास्तव्यास असलेले व उंदरखेल येथिल जि प केंद्रीय शाळा येथे मुख्याध्यापक म्हणून कार्यरत असलेले दयानंद सोनवणे यांचे दि२६ रोजी ह्रदयविकाराच्या झटक्याने पहाटे निधन झाले. त्यांची आष्टी व पाटोदा तालुक्यातील अतिदुर्गम भागात सेवा दिली आहे.पाटोदा तालुक्यातील अंमळनेर केंद्रीय शाळेचे मुख्याध्यापक असताना शाळेतील शिक्षकांच्या व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दयानंद सोनवणे यांनी आपल्या अध्यपनात कधीही कुचराई केली नाही.दि २६ रोजी कडा येथिल निवासस्थानी पहाटे अचानक ह्रदयविकाराच्या झटक्याने निधन झाले.त्यांच्या सेवानिवृत्त ला अवघे दोनच महिने राहीले होते. त्यांच्या पश्चात आई पत्नी,भाव एक मुलगी,एक मुलगा असा परिवार आहे.सोनवणे परिवाराच्या दुःखात दैनिक पुण्यभूमी परिवार सहभागी झाले.

# बंजारा समाजाच पोरगं उतरणार मैदानात!

पडघम : परिवर्तनासाठी मतदार सज्ज,जनतेचा निर्धार

गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई तालुक्यात विकास कुठेही झालाच नाही. केवळ आम्हाला मोठमोठी आश्वासने दिली. वर्षानुवर्षे अनेक गावांचा पाणी प्रश्न रखडला आहे. सत्ता असतानाही तो सुटला नाही. त्यामुळे आता आम्ही या भूलथापांना बळी पडणार नाही. मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासाकरता अण्णासाहेब राठोड यानांच आम्ही आता आमदार करून गेवराई तालुक्यात परिवर्तनाची लढाई करणार असल्याचा निर्धार तालुक्यातील जनतेने केला आहे.परिवर्तनाच्या लढाईसाठी आम्ही सज्ज आहेत, कारण आम्हाला विकास पाहिजे सहानुभूती नाही कारण या सहानभूती वर पोट भरत नाही व विकासही होत नसल्याचे



तालुक्यातील नागरिकांकडून सांगितले जात आहे. त्यामुळे गेवराई विधानसभा मतदारसंघात उमेदवार जाहीर होण्यापूर्वीच वातावरण बहुजन मय झाल्याचे दिसून येत आहे.

सत्ताधारी लोकप्रतिनिधींची खोटी आश्वासने, त्याला होणारा अल्पसा विरोध

पान २ वर...

> गेवराई विधानसभा जागेवर नैसर्गिकरीत्या आमचाच बहुजनांचा हक्क आहे. त्यामुळे ही निवडणूक कोणत्याही परिस्थितीत आम्ही लढविणार आणि जिंकणार सुद्धा !
>
> – दत्तात्रेय येवले (तालुका उपाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी)

> गेवराई विधानसभा मतदारसंघ हा अत्यंत चुरशीचा बनलेला आहे. येत्या विधानसभेला आम्ही बहुजनांचे कर्तबगार नेतृत्व व उद्याचे भावी आमदार अण्णासाहेब राठोड यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणार आहे.
>
> – सतीश राठोड ( व्हीजेएनटी तालुकाध्यक्ष गेवराई )

# कानडी माळी रस्त्याचे काम धीम्या गतीने

निवेदन : नागरिकांना होतेय गैरसोय




केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज ते कानडीमाळी रस्त्याचे काम सुरु असून हे काम अत्यंत धीम्या गतीने व निकृष्ठ दर्जाचे होत असल्याने लोकांना रहदारी साठी नाहक त्रास होत आहे. त्यामुळे हा रस्ता लवकरात लवकर दुरुस्त करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार)पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे.याबाबत सविस्तर वृत्त असे की,केज ते कानडीमाळी रस्त्याच्या कामासाठी रस्ता खोदल्यामुळे नालीतील पाण्यामुळे व पावसामुळे रस्त्यावर पूर्णपणे चिखल झाल्याने रस्त्यावर अपघाताचे प्रमाण वाढले आहे.लहान वाहनधारक घसरून पडण्याचे प्रमाण वाढले आहे.तसेच ये जा करणाऱ्यांना तारेवरची कसरत करावी लागत आहे.


त्यामुळे या रस्त्याची एक बाजू प्रवासासाठी खुली करावी अन्यथा खा.बजरंग बाप्पा सोनवणे व मा. आ. पृथ्वीराज साठे यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्याचा इशारा निवेदनाव्दारे दिला आहे.निवेदनावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार युवक तालुकाध्यक्ष कैलास चाळक,शहराध्यक्ष इमाद फरोकी, विष्णू पाटील,दीपक राऊत,ऋषीकेश जाधव,मेटे सुरेश, यश काळे,मोहम्मद हरणमारे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# गेवराई विधानसभेची उमेदवारी द्यावी

उद्धव मडके : मुस्लिम समाजातील अय्युब बागवान चांगला चेहरा

गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

मराठा आरक्षण आंदोलनात सावली सारखी साथ देवून खांद्याला खांदा लावून सोबत काम करणाऱ्या मुस्लिम समाजातील ओबिसी असलेल्या आणि समाज हितासाठी लेखणीच्या माध्यमातून गोर गरिबांचा आवाज बुलंद करणारे पत्रकार अय्युब बागवान यांना मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी विधासभेची उमेदवारी देवून मुस्लिम समाजाला प्रतिनिधीत्व द्यावे , अशी मागणी युवा नेते उद्धव मडके यांनी केली आहे.



गेवराई विधासभा मतदार संघात विधानसभा निवडणूक लढवण्यासाठी मराठा समाजातील अनेक जण इच्छुक उमेदवार आहेत.त्यामुळे इच्छुक असलेल्या मराठा कार्यकर्त्या मध्ये संघर्ष होण्याची शक्यता आहे. त्यामुळे, गेल्या आठ महिन्यांपासून सुरू असलेल्या मराठा आंदोलनात मुस्लिमांनी सक्रिय सहभाग घेवून जीवाचे रान करून मराठा समाजाच्या लढ्यात सहभाग घेतलेला आहे. त्याची पावती म्हणून मुस्लिम समाजाला प्रतिनिधीत्व द्यावे. या पूर्वी मुस्लिम समाजातील पत्रकार इम्तियाज जलील यांना संधी मिळाली होती. त्यांनी सर्व समाजासाठी या संधीचे सोने केले होते. त्याच धर्तीवर गरीबांचे कैवारी, दीन दुबळ्याचा आवाज लेखणीच्या माध्यमातून उठवणारे ,जिगरबाज पत्रकार अय्युब बागवान यांच्या समाजकार्याची पावती म्हणून मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी गेवराई विधानसभेतून निवडणूक लढवण्यासाठी उमेदवारी द्यावी अशी मागणी उद्धव मडके यांनी केली आहे. दरम्यान, गेल्या अनेक वर्षांपासून ज्येष्ठ पत्रकार अय्युब बागवान यांनी सर्व सामान्य घटकाला न्याय मिळवून देण्यासाठी, पत्रकारितेत काम केले आहे. मितभाषी स्वभाव असलेले बागवान ओबीसी

पान २ वर...

नियोजन : अजिंक्य चांदणेंच्या समन्वयातून पोलीस अन् युवकांची शांतता बैठक

# साठे महोत्सवासाठी पोलीस यंत्रणा सज्ज

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

साहित्यसम्राट अण्णाभाऊसाठेंच्या जयंतीनिमित्त बीड शहरामध्ये येत्या २९ जुलै ते १ ऑगस्ट या कालावधीत साहित्यसम्राट गौरव महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. हा महोत्सव साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव समिती यांच्याकडून आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवाच्या कालावधीत कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये यासाठी बीड शहरातील चांदणेवाडा येथे पोलीस प्रशासनाची शांतता समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. दरम्यान या साहित्यसम्राट गौरव महोत्सवासाठी बीड शहराची पोलीस यंत्रणा सज्ज झाली आहे.

यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, पोलीस निरीक्षक शितलकुमार




बल्लाळ, पोनि अशोक मोदीराज,पोनि मारोती खेडकर, जयंती उत्सव समितीच्या बीड शहर अध्यक्ष सुशीलाताई मोराळे आदी उपस्थित होते.डीपीआय प्रदेशाध्यक्ष तथा साहित्य सम्राट गौरव महोत्सवाचे समन्वयक अजिंक्य चांदणे आदी उपस्थित होते. दरम्यान पोलीस प्रशासनाच्या आग्रहाखातर अतिशय कमी वेळात शांतता बैठकीचे योग्य नियोजन करण्यात आले. दरम्यान दरवर्षी अतिशय राज्याला आदर्श निर्माण करून देता येईल. असा साहित्यसम्राट गौरव महोत्सव आयोजित केला जातो. हा महोत्सव साजरा करत असताना समन्वयक अजिंक्य चांदणे यांच्या कल्पकतेतून प्रेरक उपक्रम राबविले जातात हा महोत्सव साजरा करत असताना तेवढ्याच ताकतीने आणि हर्ष उल्हासात साजरा होण्यासाठी कार्यकर्ते तयारीला लागलेले आहेत.

परंतु या कालावधीत हा महोत्सव अतिशय देखण्या स्वरूपात आणि शांततामय वातावरणात पार पाडणे आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. त्यामुळे आपण सर्वजण मिळून ती काळजी घेऊन हा महोत्सव साजरा करणार आहोत. अशा विविध विषयावरती या शांतता कमिटीच्या बैठकीत चर्चा झाली. यावेळी साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे पदाधिकारी आणि समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सहा जणांनी केली गर्भवतीस गंभीर मारहाण

दिंद्रुड/पुण्यभूमी प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील चाटगाव येथे शेतातील बांधाच्या कारणावरून एका गर्भवती महिलेस सहा जणांनी २० जुलै शनिवार रोजी तुंबळ मारहाण केली. या घटनेत दिंद्रुड पोलिसात सहा जणांविरोधात गुन्हा नोंद करण्यात आला असून सर्व आरोपी फरार आहेत.

येथील अशोक चौरे व भीमराव बाबुराव चौरे हे शेतात एकमेकांचे शेजारी आहेत. गेल्या काही दिवसांपासून शेतातील बांधाच्या कारणावरून दोन्ही परिवारात वाद सुरू होता. यातच २० जुलै रोजी संध्या अशोक

### दिंद्रुड पोलीसात सहा जणांवर गुन्हा दाखल

चौरे या घरात एकट्या असताना गवळणबाई भिमराव चौरे, रंजना भीमराव चौरे, सतीश भीमराव चौरे, भीमराव बाबुराव चौरे, अंजना गणेश नेमाने, कृष्णा चांगिरे यांनी गर्भवती संध्या यांना गंभीर मारहाण केली. जखमी महिलेस अंबाजोगाई येथील स्वाराती रुग्णालयात दाखल केल्यानंतर २३ जुलै रोजी सर्व आरोपींवर संध्या चौरे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा नोंद करण्यात आला आहे. मात्र अद्याप सर्व आरोपी फरार असून आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी चौरे परिवाराने केली आहे. कोणत्याही गर्भवती स्त्रीला मारहाण करणे कायद्याने गंभीर गुन्हा आहे. मात्र कसलीही दया-मया न दाखवता दगडाचं काळीज असलेल्या सहाही आरोपींनी माझ्या पत्नीस तुंबळ मारहाण केली. पोलीस प्रशासनाने फरार आरोपींना तात्काळ गजाआड करून माझी पत्नी व आम्हाला न्याय द्यावा असे मत माध्यमांशी बोलताना संध्या चौरे यांचे पती अशोक चौरे यांनी मांडले.